


सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

धाराशिव

रविवार, ७ सप्टेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २७७ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



नि आपण हिंदू राष्ट्राचे भाग आहोत. मग आपण कुठेही राहात असो, कोणत्याही धर्माचे, पंथाचे असो, कोणतीही पूजा पद्धती असो, दरिद्री असो वा धनी, श्रीमंत असो वा गरीब, परंतु आपण सर्व हिंदू राष्ट्राचे भाग आहोत. आपले हिंदू राष्ट्र एक विराट पुरुष आहे आणि आपण सर्व त्याचा भाग आहोत.

**बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# जिल्हा दूध संघ संचालक मंडळ बरखास्तीवर ६ महिन्यांत निर्णय द्या : उच्च न्यायालय

*** सहकार मंत्र्यांना दिले आदेश; गेल्या वर्षभरापासून अपील होते प्रलंबित**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ डिसेंबर -**

सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाच्या संचालक मंडळ बरखास्तीच्या निर्णयावर सहा महिन्यांच्या आत कारवाई पूर्ण करा, असे आदेश उच्च न्यायालयाने सहकारमंत्र्यांना दिले आहेत. दूध संघ बचाव कृती समितीच्या वतीने यासंदर्भात न्यायालयात दावा दाखल करण्यात आला होता. विद्यमान अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांचे संचालक मंडळ उपनिबंधकांनी बरखास्त केले होते. राज्याच्या सहकारी संस्थांच्या सहनिबंधकांनी हा आदेश रद्द ठरवला. सहनिबंधकांच्या निर्णय विरोधात गेल्या वर्षभरापासून सहकारमंत्र्यांकडे अपील प्रलंबित आहे.

सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाचे तात्कालिक संचालक मंडळ पुणे विभागाचे उपनिबंधक राजकुमार पाटील यांनी बरखास्त केले होते. यासंदर्भात संघाची सभासद संस्था असलेल्या मोहोळ तालुक्यातील विरवडे येथील चंद्रभागा दूध उत्पादक संस्थेने तक्रार दाखल केली होती. संघाचे वाढलेले कर्ज, वाढलेला तोटा, बेकायदेशीर नोकर भरती यासह इतर गंभीर बाबींमुळे सहकार कायदा कलम ७८ अन्वये मार्च महिन्यात हे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले होते.

दरम्यान, राज्याचे सहनिबंधक शहाजी पाटील यांनी उपनिबंधकांच्या आदेशाला स्थगिती दिली व त्यानंतर त्यांनी उपनिबंधकांची कारवाईच रद्दबादल ठरवली. सहनिबंधकांच्या या निर्णयाच्या विरोधात चंद्रभागा संस्थेच्या वतीने सहकारमंत्र्यांकडे अपील दाखल करण्यात आले. मात्र गेल्या सहा महिन्यांपासून यासंदर्भात सुनावणी झाली नसल्याने संस्थेने उच्च न्यायालयात धाव घेतली. यासंदर्भात सुनावणी पूर्ण झाली असून उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मकरंद कर्णिक आणि न्यायमूर्ती अजित कडेठाणकर यांच्या खंडपीठाने निकाल जाहीर केला आहे. संस्थेच्या वतीने ॲड.गुरुबाळा बिराजदार यांनी काम पाहिले.

### जागा विक्रीसाठी सहकार विभागातूनच सहकार्य

राज्याच्या सहकारी संस्थांचे सहनिबंधक शहाजी पाटील यांनी जिल्हा सहकारी दूध संघाच्या संचालक मंडळ बरखास्त करण्याच्या उपनिबंधकांच्या निर्णयाला रद्दबातल केले होते. संस्थेचे भाग भांडवल शून्यावर आले असून संस्थेवर ६० कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे. अशी परिस्थिती असताना सहकार कायद्यानुसार संस्थेवर अवसायक नेमणे बंधनकारक असतानाही सहनिबंधकांनी संचालक मंडळाला अभय दिले. गेल्या वर्षभरात संघाच्या संचालक मंडळाकडून संघ सुरु करण्यापेक्षा संघाच्या जागा विक्रीसाठीच जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचा आरोप होत आहे, याला सहकार विभागातूनच सहकार्य मिळत असल्याचीही चर्चा आहे.

## महत्त्वाचे

### जानेवारीत होणार 'परीक्षा पे चर्चा' नोंदणी सुरू

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वार्षिक 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमाची नववी आवृत्ती जानेवारी २०२६ मध्ये आयोजित केली जाईल. यासाठी नोंदणी ११ जानेवारीपर्यंत खुली आहे. 'परीक्षा पे चर्चा' नवव्या पर्वात येणार आहे. भारत आणि विदेशातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षक पंतप्रधानांशी परीक्षेच्या ताणावर चर्चा करण्यासाठी संवाद साधतील आणि परीक्षा हा जीवनाचा अविभाज्य भाग किंवा उत्सव म्हणून साजरा करतील, असे अधिकाऱ्याने सांगितले. सहभागींच्या निवडीसाठी १ डिसेंबर ते ११ जानेवारी दरम्यान माय जीओव्ही पोर्टलवर बहुपर्यायी प्रश्नांसह ऑनलाईन स्पर्धा आयोजित केली जात आहे. 'परीक्षा पे चर्चा' या मालिकेचे आठवे पर्व या वर्षी १० फेब्रुवारी रोजी प्रसारित झाले. राष्ट्रीय राजधानीतील सुंदर नर्सरी येथे एका नाविन्यपूर्ण स्वरूपात हा संवाद आयोजित करण्यात आला होता.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर लोटला भीमसागर

**मुंबई :** भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्यभूमीवर त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी जमले होते. बाबासाहेबाचा जयघोष करीत राज्याच्या कानकोपऱ्यातून अबाल वृद्ध भीमसैनिक याठिकाणी जमले आहेत. राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विविध राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकाऱ्यांनी चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केले. ग्रंथप्रदर्शन, एक वही एक पेन अभियान राबविण्यात आले. अभिवादनासाठी आलेल्या अन्वयांचे गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेच्या वतीने सर्व आवश्यक सोयी सुविधा पुरवण्यात आल्या होत्या.

### अर्थसंकल्पापूर्वी सरकार कस्टम प्रणालीत बदल

**नवी दिल्ली -** अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी घोषणा केली आहे की, कस्टम प्रणालीमध्ये लवकरच अनेक मोठे बदल केले जातील. ही सरकारची पुढील सर्वात मोठी सुधारणा असेल. याचा उद्देश नियम सोपे करणे आहे, जेणेकरून व्यवसाय आणि व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही. गेल्या दोन वर्षांत ड्युटी दर हळूहळू कमी करण्यात आले आहेत आणि आता जे आयटम्स अजूनही उच्च ड्युटी असलेले आहेत, त्यांच्यावरही लक्ष केंद्रित केले जाईल. ही सुधारणा अर्थव्यवस्थेला मजबूत करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे, जिथे पारदर्शकता वाढेल आणि अनुपालन सोपे होईल.

### 'बांगलादेशी घुसखोर जन्म प्रमाणपत्र घोटाळा' पुस्तिकेचे प्रकाशन

**मुंबई -** किरीट सोमय्या यांची राष्ट्राप्रती निष्ठा वाखाणण्याजोगी असून बाळासाहेब ठाकरे यांनी वाचा फोडलेल्या बांगलादेशी-रोहिंग्यांच्या मुद्द्याला खऱ्याअर्थाने मार्गी लावण्याचे मोलाचे काम केले.असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शनिवारी केले. माजी खा. सोमय्या यांच्या 'बांगलादेशी घुसखोर जन्म प्रमाणपत्र घोटाळा' या पुस्तिकेचे प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.

# आज सायंकाळपर्यंत परतावा द्या

**केंद्र सरकारचा इंडिगोला दणका ● अव्वाच्या सव्वा तिकिट दर आकारणीला चाप**

**पुढील दोन दिवसांमध्ये प्रवाशांचे सामान पोहचविण्याचे निर्देश**






**◆ नवी दिल्ली, ६ डिसेंबर**

प्रवाशांना वेठीस धरणाऱ्या इंडिगो कंपनीला केंद्र सरकारने शनिवारी दणका दिला. प्रवाशांनी रद्द केलेल्या तिकिटांचा परतावा रविवारी सायंकाळपर्यंत द्या. त्याचप्रमाणे प्रवाशांचे साहित्य पुढच्या दोन दिवसांत त्यांना सोपवा, असा आदेश नागरी उड्डयन मंत्रालयाने दिला. इंडिगो कंपनीने उड्डाणे रद्द केल्यामुळे हजारो प्रवाशांना फटका बसला आहे.

देशातील सर्वात मोठी विमान कंपनी इंडिगोने शनिवारी पाचव्या दिवशी ८०० पेक्षा जास्त उड्डाणे रद्द केल्याने सेवेत व्यत्यय आला आहे. परतावा प्रक्रियेत कोणताही विलंब झाल्यास किंवा पालन न केल्यास त्वरित नियामक कारवाई केली जाईल, असा इशारा मंत्रालयाने दिला आहे.

रद्द झालेल्या किंवा विस्कळीत झालेल्या सर्व उड्डाणांसाठी परतावा प्रक्रिया रविवारी रात्री आठ वाजेपर्यंत पूर्ण करावी लागेल, असे मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. उड्डाण रद्द झाल्याने ज्या प्रवाशांचा प्रवास रद्द किंवा प्रभावित झाला, त्यांच्याकडून कोणतेही पुनर्निधारण शुल्क आकारू नये, असे यात म्हटले आहे.

शनिवारी विविध विमानतळांवर ८०० पेक्षा जास्त उड्डाणे रद्द करण्यात आली. इंडिगोला समर्पित प्रवासी समर्थन आणि परतावा सुविधा कक्ष स्थापन करण्याचा निर्देश देण्यात आला आहे. या सेलना बाधित प्रवाशांशी सक्रियपणे संपर्क साधण्याचे आणि परतावा तसेच पर्यायी प्रवास व्यवस्था वारंवार पाठपुरावा न करता प्रक्रिया केल्या जातील, हे सुनिश्चित करण्यास सांगितले आहे. विमान परिचालन पूर्णपणे स्थिर होईपर्यंत स्वयंचलित परताव्यांची प्रणाली सक्रिय राहील, असे निवेदनात म्हटले आहे. उड्डाण रद्द झाल्यामुळे किंवा विलंब झाल्यामुळे प्रवाशांपासून वेगळे केलेले सामान पुढील ४८ तासांच्या आत प्रवाशांपर्यंत पोहोचवले जावे, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

**विमानभाडे मर्यादा लागू**

इंडिगोने अनेक विमाने रद्द केल्याने अनेक मार्गांवर विमान तिकिटांचे दर वाढले होते. त्यामुळे सरकारने शनिवारी विमानभाडे मर्यादा लागू केल्या. देशातील सर्वांत मोठी विमान कंपनी असलेल्या इंडिगोने कर्मचाऱ्यांच्या अडचणींमुळे सलग पाच दिवसांपासून शेकडो उड्डाणे रद्द केली आहेत. ◀(वृत्तसंस्था)

### पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतली माहिती

विमान कंपन्यांमुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, या सर्व घडामोडींवर पंतप्रधान कार्यालयाची करडी नजर आहे. या घडामोडींबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सविस्तर माहिती देण्यात आली. सध्या पंतप्रधान कार्यालय इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पिटर एल्बर्ससोबत संवाद साधत आहे. उड्डाणे लवकरात लवकर सामाय करा, असा कठोर संदेश एल्बर्स यांना देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### सरकारने निर्धारित केलेले कमाल दर

| अंतर (किमीत) | दर (रुपयांत) |
|---|---|
| ५०० | ७,५०० |
| ५०० ते १००० | १२००० |
| १००० ते १५०० | १५००० |
| १५०० अधिक | १८००० |




# उद्यापासून हिवाळी अधिवेशन

**आजच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार ● दोन्ही सभागृहात विरोधीपक्ष नेताच नाही**

**◆ नागपूर, ६ डिसेंबर**

येत्या ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच रविवार, ७ डिसेंबरला सायंकाळी ६ वाजता रामगिरीवर विरोधकांसाठी तसेच विधिमंडळातील सदस्यांसाठी चहापानाचा कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोजित केला आहे. विरोधकांसाठी चहापान आयोजित करण्याची विधिमंडळाची परंपरा आहे. परंतु, विरोधक नेहमीप्रमाणे चहापानावर बहिष्कार घालत असतात. ही परंपरा यंदाही कायम असल्याचे सूत्रांनी सांगितले. विशेष म्हणजे विधिमंडळाच्या विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहात विरोधी पक्ष नेताच नाही. त्यामुळे विरोधी पक्षनेत्याविनाच सभागृहाचे कामकाज चालणार आहे की, नव्याने विरोधी पक्षनेत्यांची निवड होणार आहे, हा औत्सुकतेचा विषय आहे.

८ डिसेंबरपासून महाराष्ट्राच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. राज्याची उपराजधानी नागपुरात हे अधिवेशन पार पडणार असून राज्य सरकारसह विरोधक या अधिवेशानासाठी सज्ज झाले आहेत. सोमवारपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्याची पद्धत आहे. पण विरोधकांकडून मात्र या चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार घालत अधिवेशनाच्या पूर्वसंध्येलाच राज्य सरकारविरुद्ध बिगुल वाजवला आहे. नागपुरात गुलाबी थंडी असताना राजकीय वातावरण तापल्याचे चिन्ह आहे.

हे अधिवेशन प्रारंभी दोन आठवड्यांचे ठेवण्यात आले होते. दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीची ३ डिसेंबरची मतमोजणी रद्द करून ती उर्वरित निवडणुक पार पडल्यानंतर २१ डिसेंबरला घेण्याचे निर्देश दिले. त्यामुळे आचारसंहिता ही २१ डिसेंबरपर्यंत कायम राहणार आहे. परिणामत: हिवाळी अधिवेशनावर आचारसंहितेचे सावट राहणार आहे. त्यामुळे संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या झालेल्या बैठकीत अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर या कालावधीत घेण्याचे ठरले. ◀(तभा वृत्तसेवा)



**हिवाळी अधिवेशन**

### विरोधकांची धार बोथट

हिवाळी अधिवेशनात मांडण्यासाठी विरोधकांकडे विविध मुद्दे आहेत.मात्र,विधिमंडळाच्या विधानपरिषद व विधानसभा या दोन्ही सभागृहात विरोधीपक्ष नेते नसल्याने विरोधकांच्या सरकारवरील टीकेला धार राहणार नसल्याचे सत्ताधारी नेते सांगत आहेत.

# बडोद्याचा मुंबईवर ५१ धावांनी विजय

**सोलापूर -** येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर काल पासून सुरू झालेल्या महाराष्ट्र मुंबई व बडोदा राज्याच्या १५ वर्षाखालील मुलींच्या प्रत्येकी ३५ षटकांच्या सराव साम न्यात आज मुंबईने बडोदावर ५१ धावांनी विजय मिळविला.

सकाळी नाणेफेक जिंकून मुंबई संघाने क्षेत्ररक्षण स्वीकारले. बडोदा संघाने निर्धारित ३५ षटकात ६ बाद १९९ धावा केल्या. त्यांच्याकडून जानवी पाटील ७१ न्यासा ठाकूर ३० धावा केले तर मुंबई कडून स्वास्ति शिंदे, काव्या भागवत यांनी प्रत्येकी १ बळी घेतले. ३ गडी धावबाद झाल्या. प्रत्युत्तरदाखल मुंबई संघ निर्धारित ३५ षटकात ९ बाद १४८ धावाच करू शकला. मुंबई कडून सिद्धी आरेकर ४४, मुद्रा खेडेकर २८ धावा केल्या तर बडोदा कडून वैभवी देवकते देवी खरादे यांनी प्रत्येकी २, द्रव्या पारीख न्याशा तिवारी यांनी एकेक बळी मिळवला व ३ खेळाडू धावबाद झाल्या. पंच म्हणून सुहेल मुनशी, नवीन माने व गुणलेखक म्हणून प्रसाद शावंतुल यांनी काम पाहिले. उद्या महाराष्ट्र विरुद्ध बडोदा असा सामना होणार असल्याचे जिल्हा संघटनेच्या वतीने कळविण्यात आले.



**भारतीय जनता पार्टी :** भारतीय जनता पार्टीच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, अजित गायकवाड, वंदना गायकवाड, प्रा.नारायण बनसोडे, दशरथ कसबे आदी उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर स्मारक वर्षात पूर्ण करु

**मुख्यमंत्री फडणवीस यांचा मानस ● चैत्यभूमीवर महामानवाला वाहिली आदरांजली**

**◆ मुंबई, ६ डिसेंबर**

मुंबईच्या इंदू मिल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याचे कार्य प्रगतिपथावर असून, पुढील महापरिनिर्वाण दिनापर्यंत पूर्ण करण्याचा मानस असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राच्या प्रगतीचा पाया घातल्याचे नमूद करून बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार आहे.

नुकतेच अमेरिकेच्या न्यूजर्सीचे गव्हर्नर महाराष्ट्रात आले होते. तेव्हा त्यांनी न्यूयार्कसह इतर शहरात वीजेची प्रचंड टंचाई जाणवत असल्याचे सांगितले. कारण आमच्याकडे स्टेट ग्रीड असून, नॅशनल ग्रीड नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले. त्यावेळी अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राला जे समजले नाही. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना किती आधी कळाले. यावरून ते किती द्रष्टे होते याची कल्पना येते. ऊर्जा सुरक्षेच्या क्षेत्रात डॉ. आंबेडकरांचे योगदान अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, ऊर्जामंत्री असताना राष्ट्रीय विद्युत ग्रीडची संकल्पना बाबासाहेबांनी आणली आणि ती वेळेत स्वीकारली. त्यातून देश ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे. भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी आणि सामान्य जनतेच्या हक्कांचे रक्षण हे बाबासाहेबांच्या संविधानामुळेच शक्य झाले. ◀(तभा वृत्तसेवा)



महापरिनिर्वाणदिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना श्रद्धांजली अर्पण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मान्यवर

### पंतप्रधान म्हणतात, धर्मग्रंथापेक्षा संविधान महत्वाचे

माझ्याकरता कुठल्याही धर्मग्रंथापेक्षा भारताचं संविधान महत्वाचं आहे. कारण हे संविधानच प्रत्येक भारतीयांचं कल्याण करु शकते, असे आपल्या देशाचे पंतप्रधान नेहमी म्हणतात, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

# तिसरा वन डे जिंकून भारताने मालिका जिंकली

**द. आफ्रिकेचा ९ विकेट्सने पराभव; जैस्वालचे शतक, कुलदीप अन् प्रसिद्धच्या प्रत्येकी ४ विकेट्स**

**विशाखापट्टणम -**

विशाखापट्टणम येथे झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा ९ विकेट्सने पराभव केला. टीम इंडियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेला फक्त २७० धावा करता आल्या. भारताने ४० व्या षटकात लक्ष्य गाठले, फक्त एक विकेट गमावली. तिसरा वन डे जिंकून भारताने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली.

डॉ. वाय.एस. राजशेखर रेड्डी स्टेडियमवर पाहुण्या संघाकडून क्विंटन डी कॉकने शतक झळकावले. कर्णधार टेम्बा बावुमाने ४८, देवाल्ड ब्रेव्हिसने २९ आणि मॅथ्यू ब्रेइट्झकीने २४ धावा करून संघाला २७० धावांपर्यंत पोहोचवले. भारताकडून कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या. २७१ धावांच्या लक्ष्याचा सामना करताना, यशस्वी जयस्वाल आणि रोहित शर्मा यांनी भारताला दमदार सुरुवात दिली. त्यांनी १५५ धावांची भागीदारी केली.

रोहित ७५ धावांवर बाद झाला, हा मालिकेतील त्याचे पहिले अर्धशतक होते. त्यानंतर यशस्वीने १११ चेंडूत त्याचे पहिले एकदिवसीय शतक झळकावले. विराट कोहलीनेही त्याच्या पाठोपाठ फक्त ४० चेंडूत अर्धशतक झळकावले.

दोघांनीही ४० व्या षटकात विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेसाठी केशव महाराजने एकमेव विकेट घेतली. दोन्ही संघांमधील पाच सामन्यांची टी-२० मालिका ९ डिसेंबरपासून सुरू होईल.

## महत्वाचे...

### सीईओंच्या आश्वासनानंतर ग्रामसेवकांचे आंदोलन मागे

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी कर्मचारी युनियनच्या माध्यमातून सुरू केलेले असहकार आंदोलन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर मागे घेतले असल्याची माहिती युनियनचे जिल्हाध्यक्ष शरद भुजबळ यांनी दिली. ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांच्या मनमानी कारभार विरोधात जिल्ह्यातील ग्रामसेवकांनी २४ नोव्हेंबरपासून असहकार आंदोलन सुरू केले होते.ग्रामसेवकांच्या तक्रारी अर्जानंतर जिल्ह्यातील ग्रामसेवकांच्या प्रश्नासंदर्भात तोडगा काढण्यासाठी गुरुवारी मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कोहिनकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, पंढरपूरचे गटविकास अधिकारी अमोल जाधव यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत केली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांच्या प्रमुख उपस्थितीत चौकशी समितीतील सदस्यांसह युनियनचे जिल्हाध्यक्ष शरद भुजबळ यांच्या उपस्थितीत गुरुवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस युनियनचे जिल्हा कार्याध्यक्ष नारायण ढवळे, सरचिटणीस दयानंद पाटील, किसन माळी, दादासाहेब अडसूळ, कैलास कोरके, विजयसिंह माने-देशमुख, संजय शिंदे आदी उपस्थित होते. सदर बैठकीत ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाच्या आस्थापनाविषयक प्रलंबित बाबींवर चर्चा करण्यात आली. प्रलंबित प्रश्नावर येत्या पंधरा दिवसात कार्यवाही करण्याचे आश्वासन यावेळी जिल्हा परिषद प्रशासनाकडून देण्यात आले. त्यानंतर ग्रामसेवकांचे असहकार आंदोलन मागे घेतल्याची घोषणा केली.



### लोकविकास स्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन

**वेळापूर, दि.६ डिसेंबर-**

वेळापूर येथील लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक अश्विनी शिंदे व लोकविकास ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक अमोल पांढरे, अजित बनकर , विजया चापले यांच्या हस्ते झाले. इयत्ता चौथी मधील संस्कृती पांढरे, स्वरित बनकर यांनी तसेच सहशिक्षिका राणी शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कोमल चव्हाण व आभार प्रदर्शन वैशाली आदलिंगे यांनी केले. राहुल बनकर,अमोल साठे,सिनाप्पा शेंडगे, सचिन साळुंखे, तेजस्वी पिसे, प्रज्ञा गिरमे, श्रद्धा आडसुळे,ज्योती गाडेकर, पूजा कुदळे आदी शिक्षक उपस्थित होते.



### मंद्रूपमध्ये वीरभद्रेश्वर यात्रा उत्साहात

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर..**

येथील वीरभद्रेश्वर यात्रेनिमित्त मंद्रूप येथील मुख्य रस्त्यावरून देवाच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. वीरभद्रेश्वर मंदिरापासून गावतलावाजवळील अग्निकट्टापर्यंत पुरवंतसह सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. गुरूवारी पहाटे श्रीस रूद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर सकाळपासून दर्शनासाठी भक्तांची गदद्दृ दिसून आले. त्यानंतर आरती करून मिरवणूकीस सुरूवात करण्यात आली. गावातील मुख्य ठिकाणी पुरवंतानी कला सादर केला. दुपारी बारा वाजता अग्निकट्टा येथे पालखी आल्यानंतर पूजा करून अग्निमहोत्सव करण्यात आला. यावेळी भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

### कुबेर कॉम्प्लेक्स परिसरातून दुचाकी चोरी

**सोलापूर, दि.६ डिसेंबर-**

विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकी चोरीची घटना उघडकीस आली आहे. तानाजी लिंबराज पाटुळे (वय ३८, रा. स्वामी विवेकानंद नगर भाग-२, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यावर गाडी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते १२.३० दरम्यान कुबेर कॉम्प्लेक्स, विजापूर रोड येथे ही घटना घडली. पाटुळे यांनी त्यांची काळ्या रंगाची हिरो पॅशन प्रो मोटारसायकल (एमएच १३ डीएन ५७११) हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. मात्र, संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने सुमारे २५ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेची नोंद ४ डिसेंबर रोजी करण्यात आली असून पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल फुटाणे करीत आहेत.

### शासकीय हमीभाव मका खरेदी ऑनलाईन नांव नोंदणी साठी मुदतवाढ

**पंढरपूर,दि.६ डिसेंबर -**

शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर हमीभावाने मका विक्री करण्यासाठी पंढरपुर तालुक्यातील शेतकरी बांधवांनी दि.१५ डिसेंबर अखेर आपली मका ऑनलाईन नांव नोंदणी पंढरपूर तालुका सह. खरेदी विकी संघ लि., नवी पेठ, पंढरपूर येथे करावी.ऑनलाईन नांव नोंदणी शिवाय शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर मका विक्री करता येणार नाही. तरी तालुक्यातील जास्तीत-जास्त शेतकरी बंधुनी याचा लाभा घ्यावा असे आवाहन बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजुबापू गावडे यांनी केले आहे. सभापती गायकवाड यांनी सांगितले की, शासनाचे हमीभाव खरेदी योजने अंतर्गत ३० नोव्हेंबर अखेर मका उत्पादक शेतकरी बांधवांनी शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर ७/१२ उतारा, मका पिकाची नोंदीसह, आधारकार्ड व बँक पासबुक झेरॉक्स इत्यादी कागदपत्रे जमा करून ऑनलाईन नांव नोंदणी करणेसाठी वरील कालावधी निश्चित केला होता. मुदत वाढ मिळावी म्हणून मागणी केलेली होती. या मागणी प्रमाणे राज्य शासनाने दि. १५ डिसेंबर पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे. मक्यासाठी हमीभाव रू.२४००/- प्रति क्विंटल आहे.

# कारखानदारांचे ऊस दराबाबत अद्यापही मौनच

### शेतकरी संघटनेच्या आंदोलनालाही न जुमानता हंगाम सुरुच

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ६ डिसेंबर-**

यंदाचा ऊस गळीत हंगाम सध्या जोरात सुरु आहे. माळशिरस तालुक्यातील साखर कारखानदारांनी ऊस दराबाबत अद्यापही मौन बाळगले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने ३० नोव्हेंबरपर्यंत दर जाहीर करण्याचा अल्टीमेटम दिला होता पण एकाही कारखानदाराने ऊस दर जाहीर ने केल्याने शेतकऱ्यांतून नाराजी आहे.

तालुक्यात पाच साखर कारखाने आहेत. चांदापुरी येथील ओंकार साखर कारखाना वगळता बाकीचे सर्व साखर कारखाने दिग्गज नेत्यांचे आहेत. ते कारखाने अतिशय जुने आहेत. यामुळेच शेतकऱ्यांना या सर्वच साखर कारखान्याकडुन चांगल्या दराची अपेक्षा आहे. पण हे कारखानदार शेतकऱ्यांना दराबाबत न्याय देतच नाहीत. एकाही कारखानदाराने ऊस दर जाहीर न करता काही कारखान्यांनी २८०० तर काहींनी २८५० एवढाच पहीला हप्ता दिला आहे. शेतकरी संघटनेची ३४०० रुपये पहीली उचल द्यावी अशी मागणी आहे पण एकाही कारखानदाराने दर न जाहीर करता शेतकऱ्यांना पहीला हप्ता थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला



आहे. माळशिरस तालुक्यातील सहकार महर्षी व सदाशिवनगर येथील शंकर सहकारी कारखाना हे दोन्ही अतिशय जुने व मोहीते-पाटील यांचे साखर कारखाने आहेत. माळीनगर येथील कारखाना गिरमे यांचा सर्वात जुना, श्रीपुर येथील साखर कारखाना परिचारक यांचा तर चांदापुरी येथील ओंकार साखर कारखाना बोत्रे-पाटील यांचा आहे. सर्वच कारखाने अतिशय दिग्गजांचे आहेत. हे सर्व कारखानदार वेगवेगळ्या राजकीय पक्षात असले तरी दर देताना यांची चांगलीच मिलीभगत आहे. माळशिरस तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा शेतकऱ्यांना चांगला दर मिळावा म्हणून जोरदार प्रयत्न आहे पण आंदोलनाला शेतकऱ्यांचा म्हणावा असा प्रतिसाद नाही ही खरी शोकांतिकाच आहे. माळशिरस तालुक्यात पाच साखर कारखाने आहेत. ऊसाचे क्षेत्रही मोठे आहे. पण कारखानदार चांगला दर देत नसल्यामुळेच माळशिरस तालुक्यातील ऊस सातारा, पुणे, सांगली या शेजारच्या जिल्ह्यातील कारखान्यास मोठ्या प्रमाणावर जात आहे. शेजारच्या सर्वच जिल्ह्यात ३४०० ते ३५०० रुपये एवढा दर आहे. यामुळेच गेल्या चार-पाच वर्षापासून माळशिरस तालुक्यातील ऊस मोठ्या प्रमाणात शेजारच्या जिल्ह्यात गाळपास जात आहे. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांना टनामागे पाचशे ते सहाशे रुपये जास्त मिळतात. माळशिरस तालुक्यातील अनेक शेतकरी सध्या तालुक्यातील एकाही कारखान्यास ऊस न देता शेजारच्या जिल्ह्यातील साखर कारखान्यास देत आहेत. यामुळे माळशिरस तालुक्यातील कारखानदारांनी दराबाबत आत्म चिंतन करणे गरजेचे आहे. भविष्यात ऊस दरामुळे माळशिरस तालुक्यातील साखर कारखानदारी अडचणीत येणार हे नक्की आहे.

> माळशिरस तालुक्यातील साखर कारखानदारांनी ऊसाला ३४०० रुपये एवढी पहीली उचल द्यावी. सर्व साखर कारखाने जुने आहेत. ते उपपदार्थ निर्मीती करतात. त्यामुळे चांगला दर देण्यास काहीच अडचण नाही.
>
> **- अजित बोरकर,**
> अध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना, माळशिरस.

## कला-साहित्य-संस्कृतीमुळे गावाची खरी श्रीमंती; माजी आ. परिचारक

**भडगांवकरांच्या 'आठवणींच्या गंधकोषी' पुस्तकाचे प्रकाशन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ डिसेंबर -**

श्रीक्षेत्र पंढरपूरला शास्त्रीय संगीताची मोठी परंपरा आहे. ही परंपरा स्वरसाधना संस्थेने अखंड ३५ वर्षे सांभाळली आहे. कला, साहित्य व संस्कृतीमुळेच शहराची खरी श्रीमंती लक्षात येते असे प्रतिपादन माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केले.

येथील स्वरसाधना मंडळाचे सदस्य प्रदीप भडगांवकर यांनी लिहिलेल्या 'आठवणींच्या गंधकोशी' या पुस्तकाचे प्रकाशन श्री. परिचारक यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या वेळी ज्येष्ठ गायक दिलीप टोमके, प्रदीप भडगांवकर, विलास भडगांवकर, अरुण भडगांवकर, सीमा भडगांवकर उपस्थित होते. प्रदीप भडगांवकर



यांनी प्रास्ताविक केले. संगीत सेवेमुळेच ज्येष्ठ कलाकारांची सेवा करण्याचे भाग्य मिळाले आणि त्या आठवणी कायम रसिकांच्या मनात उर्जा देत रहाव्यात याच भुमिकेतून हे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी श्री. परिचारक म्हणाले, पुढील काळात कलाक्षेत्रातील स्थानिक तरुण मंडळींनी निश्चित पुढाकार घ्यावा. त्यांच्या पाठीशी कायमच आपले पाठबळ राहिल. पडद्यामागील कलाकारांचे अनुभव हे अतिशय प्रेरणादायी असतात आणि ते अनुभव प्रदीप भडगांवकर यांनी आपल्या लेखनातून पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले असल्याचे सांगत या ३५ वर्षांच्या काळातील अनेक जुन्या आठवणींचा ठेवा देखील त्यांनी उलगडत या पुस्तक प्रकाशनास शुभेच्छा देत त्यांनी अभिनंदन केले. यावेळी प्रदीप व सीमा भडगांवकर यांचा सत्कार त्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर दुधाने, मिलिंद परिचारक, ज्येष्ठ कलाकार दिलीप टोमके यांनी मनोगत व्यक्त करताना आठवणींचा गंधकोश हा आठवणींचा ठेवा पंढरपूर कला रसिक श्रोत्यांसाठी एक ऊर्जादायी आणि प्रेरणादायी ठरेल असे सांगत भंडगांवकर यांनी लिहिलेल्या पुस्तकाला शुभेच्छा दिल्या. तुकाराम चिंचणीकर यांनी सुत्रसंचलन केले. प्रवीण ताठे, प्रतिक भडगांवकर, अजीत माने यांनी परिश्रम घेतले.

## दमदाटी, शिवीगाळ केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.६ डिसेंबर -**

फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दमदाटी शिवीगाळ केल्याप्रकरणी दोन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी अंदाजे १०.३० वाजता बाबा कादरी मस्जिद परिसरात घडली.

फिर्यादी मो. युसुफ इस्माईल शहापुरे वय ५६, रा. आनंद नगर नई जिंदगी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी अ. जब्बार महेबुब शेख रा. उत्तर कसबा यांनी फोन करून फिर्यादीच्या पत्नीचे सामान खोलीतून बाहेर काढून टाकण्याची धमकी दिली. सदर खोली बांगीसाहेब यांना देणार असल्याचे सांगत शिवीगाळ व दमदाटी केली, असा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यानंतर फिर्यादीने आरोपी अ. जब्बार महेबुब शेख तसेच स्वयंघोषित मुतवल्ली असलेल्या आरोपी आसिफ अ. हुसेन शेख (रा. उत्तर कसबा) यांना भेटून खोलीचे कुलूप काढून देण्याची विनंती केली. परंतु दोघांनीही जाणूनबुजून कुलूप उघडण्यास नकार देत फिर्यादीला त्यांच्या कब्जातील खोलीत येणे-जाणे रोखल्याचा आरोप आहे. या घटनेवरून दोन्ही आरोपींवर अडथळा निर्माण करणे, दमदाटी, शिवीगाळ आणि बेकायदेशीरपणे कब्जा रोखण्याचे आरोप ठळकपणे नमूद केले गेले आहेत. या प्रकरणाचा तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल खरात हे करत आहेत.

## लहान बालकांना भीक मागायला लावणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.६ डिसेंबर -**

शहरातील महावीर चौक सिग्नलवर लहान बालकांना भीक मागायला लावणाऱ्या महिलेवर सदर बझार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्यात असल्याची माहिती सहा. पोलीस आयुक्त राजन माने यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

शहरात प्रमुख चौकातील सिग्नलवर उभे राहून भीक मागणारी लहान मुले, स्त्रिया, पुरूष यांच्यावर कारवाई करिता अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस अंमलदार व दामीनी पथक विभाग ०१ व विभाग ०२ यांचे पथक नेमण्यात आले आहे.

दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस अंमलदार तसेच दामीनी पथक विभाग ०२ कडील महिला पोलीस अंमलदार सोलापूर शहरातील महावीर चौक या ठिकाणी पेट्रोलिंग करीत असताना चौकातील सिग्नलवरील थांबण्याऱ्या प्रवाशाकडे भीक मागताना एक महिला व तिच्यासोबत ०३ बालके दिसून आली. त्यांच्याकडे चौकशी केली असता महिलेचे नाव जैताबाई महादेव पवार वय अंदाजे ४० वर्षे राहणार पारधी वस्ती, आयटीआय, जुना विजापूर नाका, सोलापूर असे आहे. सदर बालके भीक मागत असताना पथकास मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवून बाल कल्याण समिती समोर हजर करून त्यांना बालगृह येथे ठेवण्यात आले आहे.

सदर बालकांना भीक मागायला लावणाऱ्या महिला आरोपी नामे जैताबाई महादेव पवार वय अंदाजे ४० वर्षे राहणार पारधी वस्ती, आयटीआय, जुना विजापूर नाका, सोलापूर हिच्या विरुध्द बाल न्याय अधिनियम २०१५ चे कलम ७६ प्रमाणे सदर बझार पोलीस ठाणे येथे दिनांक ०५ डिसेंबर २०२५ रोजी गुन्हा रजिस्टर क्र. १०१५/२०२५ दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) डॉ. अश्विनी पाटील, सहा. पोलीस आयुक्त राजन माने, पोलीस निरिक्षक धनाजी शिंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मसपोनि स्वाती येळे, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील पथक तसेच दामीनी पथक विभाग ०१ व विभाग ०२ यांनी यशस्वीपणे केली.

## धैर्य आणि निष्ठेच्या बळावर दिव्यांग अविनाश हुलसुरे यांनी घेतले बाबासाहेबांच्या अस्थींचे दर्शन

* कुणाचीही मदत, आधार किंवा कुबड्या न घेता स्वतःच्या जिद्दीने गेले पहिल्या मजल्यावर
* प्रेरणाभूमी परिसरातील एक हृदयस्पर्शी, प्रेरणादायी प्रसंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

बुधवार पेठ, मिलिंद नगर येथे सकाळी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थीविहार प्रेरणाभूमी परिसरात एक हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी प्रसंग पाहायला मिळाला. दिव्यांग अविनाश हुलसुरे या युवकाने कुणाचीही मदत न घेता स्वतःच्या अंगातील अदम्य इच्छाशक्ती व धैर्याच्या जोरावर पायऱ्या चढून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलशास वंदन केले. दिव्यांग असूनही अढळ श्रद्धा आणि असामान्य धैर्याने बाबासाहेबांप्रती असलेला त्यांचा 'भिमप्रेमाचा' संदेश खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरला आहे.

शनिवारी सकाळी महापरिनिर्वाणदिनी मिलिंद नगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थीविहार प्रेरणाभूमी समोर तीन चाकी सायकलवरून एक दिव्यांग युवक खाली उतरला. ते कोणत्याही व्यक्तीची मदत, आधार किंवा कुबड्या न घेता स्वतःच्या जिद्दीने पहिल्या मजल्यावर चढले. अस्थिकलशाचे मनोभावे दर्शन घेऊन अभिवादन केले. पुन्हा कुणाच्या आधाराशिवाय पायऱ्यावरून खाली आले. त्यानंतर डॉ. आंबेडकरांचा पदस्पर्श लाभलेल्या ऐतिहासिक 'पंचाची चावडी' येथेही त्यांनी अभिवादन केले. त्यानंतर आपल्या तीन चाकी सायकलवरून पुढील कामाला ते मार्गस्थ झाले. अविनाश हुलसुरे यांचा हा निष्ठा, त्याग आणि जिद्दीचा प्रवास पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. दिव्यांग असूनही



अढळ श्रद्धा आणि असामान्य धैर्याने बाबासाहेबांप्रती असलेला त्यांचा 'भिमप्रेमाचा' संदेश खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरला आहे. मागील ७-८ वर्षांपासून, १४ एप्रिल आणि ६ डिसेंबरला प्रेरणाभूमीत नियमितपणे येऊन बाबासाहेबांना अभिवादन करतो. माझं जे काही आहे ते डॉ. बाबासाहेबांनीच दिलं आहे.दरवर्षी इथे नतमस्तक होऊनच माझा प्रवास सुरू होतो. यामुळे मला ऊर्जा आणि बळ मिळते.

भारतरत्न डॉ. आंबेडकर यांचे विचार हेच माझी खरी ताकद , शक्ती आणि प्रेरणा आहे, अशी कृतज्ञतापूर्वक भावना अविनाश हुलसुरे या युवकाने व्यक्त केली.

## गुळसडी-भंडारे वस्ती रस्त्याचे अखेर भूमिपूजन; २० लाखांचा निधी मंजुर



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.६ डिसेंबर-**

करमाळा तालुक्यातील गुळसडी येथील भंडारे वस्तीला मुख्य रस्त्याशी जोडणारा महत्त्वपूर्ण मार्ग गेली अनेक वर्षे रखडलेला होता. अखेर या रस्त्याचे भूमिपूजन आज भाजपाचे जिल्हा सरचिटणीस व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चिवटे यांच्या हस्ते झाले.

श्री. चिवटे म्हणाले की मी गेल्या भेटीत हा रस्ता अतिशय बिकट अवस्थेत पाहिला होता. ग्रामस्थांचा त्रास लक्षात घेऊन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मागणी केली. त्यांनी तातडीने या रस्त्यासाठी २० लाख रुपये मंजूर केले. या निधीमुळे रस्त्याचे काम आता जलद गतीने होईल. यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष अफसर तात्या जाधव, रामभाऊ ढाणे, तालुकाध्यक्ष काकासाहेब सरडे, उपाध्यक्ष बंडू शिंदे, अमोल पवार, सोमनाथ घाडगे, सचिन गायकवाड, नाना अनारसे, बंडू शिंदे, महेश दिवाण, संजय दुरगळे, अशोक मोरे, वसीम सय्यद यांच्यासह गुरसळी येथील चेअरमन महावीर कळसे, आदम शेख, सरपंच प्रमोद भंडारे, उपसरपंच योगेश भंडारे, राजेंद्र भंडारे, शिवाजी पाटील, दिगंबर भंडारे, सतीश बागल, तानाजी भंडारे , प्रताप पाटील, दत्तात्रय भंडारे , हरिभाऊ भंडारे, महादेव भंडारे, रामभाऊ माने, राहुल जाधव, रणजीत भंडारे, शिवाजी बागल, संजय कुलकर्णी , गणेश महाडीक, भरत गुंड, किरण शिंदे, विनोद इंदलकर आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बार्शीत कोयत्याची दहशत, कोयत्याने मोबाईल शॉप फोडले

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.६ डिसेंबर**

बाळेश्वर नाका परिसरातील विघ्नहर्ता मोबाईल शॉपीमध्ये एकाने कोयत्यासह घुसून केलेल्या दहशतीमुळे आज शहरात एकच खळबळ उडाली. कल्याण राजेंद्र म्हेत्रे (वय ३५. रा. कसबा पेठ) यांच्या दिलेल्या फिर्यादीवरुन बार्शी शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बबलु कसबे याच्या विरुद्ध शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी कल्याण म्हेत्रे हे बाळेश्वर नाका येथे मोबाईल शॉपी चालवतात. दि. ४ डिसेंबर रोजी बबलू कसबे यांच्या पत्नीचा मोबाईल रिचार्ज करण्याच्या कामावरुन किरकोळ गैरसमज झाला होता. यावेळी मोबाईलमध्ये नेट सुरु न झाल्याने त्यांनी शॉपमध्ये येऊन शाब्दिक वाद घातला होता. त्यावर शॉपकिपरने तात्काळ कस्टमर केअरशी संपर्क साधून समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, दुसऱ्या दिवशीही (दि. ५ डिसेंबर) मोबाईल रिचार्ज झाल्याबाबत वाद निर्माण झाला. मात्र सिमकार्डचे स्लॉट बदलताच मोबाईलमध्ये नेट सुरु झाल्यानंतर बबलू कसबे यांच्या पत्नीने मोबाईल घेऊन दुकानातून प्रस्थान केले.

**कोयत्यासह दुकानात घुसून काचा फोडल्या**

आज दि. ६ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ११.५० वाजता बबलू कसबे हे दुकानात आले. 'तु माझ्या बायकोला काय बोललास?' असे विचारताच त्यांनी कमरेत ठेवलेला कोयता काढून दुकानदाराच्या काचेच्या काउंटरवर सलग तीन वार केले. काच फुटल्याचा आवाज आणि अचानक झालेल्या हल्लयाने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले.

यानंतर कसबे यांनी दुकानात घुसून फिर्यादीचा शर्ट पकडत, कोयता उगारत 'इथं राहायचं असेल तर नीट राहा',अशी धमकी दिली आणि घटनास्थळावरुन पसार झाले.

सदर आरोपीवर जिल्हाधिकारी सोलापूर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत जारी केलेल्या शस्त्रबंदी आदेशाचा कालावधी (दि. २३ नोव्हेंबर रात्री २० वाजेपासून दि. ७ डिसेंबर रात्री २० पर्यंत) सुरु असताना कोयता बाळगल्याने हा आदेश उघडपणे धुडकावून लावल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेनंतर दुकानदाराने तात्काळ डायल ११३ वर संपर्क करुन पोलिसांत तक्रार नोंदवली. पोलिसांनी गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.

# मनपा, झेडपी निवडणुकांचा धुरळा जानेवारीतच

## ● निवडणुका जानेवारीअखेरच घेण्याच्या आदेशावर सुप्रिमचे पुन्हा शिक्कामोर्तब; युती-आघाड्यांबाबत खलबतं सुरु

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

**नगरपालिका, नगरपंचायतींचे मतदान संपले असून येत्या २१ डिसेंबरला कारभारी कोण याचा निकालही जाहीर होईल. दरम्यान नुकतेच सुप्रिम कोर्टाने पुन्हा एकदा निवडणूक आयोगाला आदेश देत सुनावले आहे की, महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका जानेवारी २०२६ पर्यंत घ्या. त्यामुळे डिसेंबर २०२५ अखेरीसच या निवडणुकांची घोषणा होणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांसह इच्छुकांनी तयारीला लागण्यात काही हरकत नसावी. नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये सर्व तत्वं बाजूला ठेवून कोणता पक्ष, कोणत्याही पक्षाबरोबर युती करून कसल्याही परिस्थितीत सत्ता काबीज करायचीच चंग बांधल्याचे दिसून आले. या निवडणुकीत सत्ताधारी-विरोधकांमध्ये राडा दिसला. पण, महायुतीतील मित्रपक्षांमध्ये देखील आरोप-प्रत्यारोप दिसून आले. पक्ष फोडाफोडीच्या प्रकाराने महाराष्ट्राचे राजकारण ढवळत असून आगामी निवडणुकांमध्ये तर हे प्रकार आणखीन वाढण्याचा धोका व्यक्त होत आहे.**




सोलापूर महापालिकेच्या पार्श्वभूमीवरील राजकारण पाहिल्यास शहरात भाजपा हा अगदी मजबूत पक्ष आहे. मागील काळात महापालिकेत भाजपाची एकहाती सत्ता होती. १०२ नगरसेवकांपैकी ४९ नगरसेवक भाजपाचे होते. एकत्रित शिवसेनेचे २१, काँग्रेसचे १४, एमआयएमचे ९, एकत्रित राष्ट्रवादीचे ४, बसपाचे ४, माकप १ असे सोलापूर महापालिकेत पक्षीय बलाबल होते. आगामी निवडणुकांमध्ये देखील भाजपा मजबूत आहे. कारण आता शहरातील तीनही आमदार भाजपाचे आहेत. त्यामुळे भाजपा मित्रपक्ष शिवसेना व राष्ट्रवादी यांना सोबत घेवून महायुती करेल का याबाबत शंकाच आहे. भाजपाचा रागरंग ओळखून आणि नगरपालिका निवडणुकीतील पालकमंत्र्यांच्या राजकीय खेळी पाहून भाजपाचे मित्रपक्ष आता सजग झाले आहेत. अजित पवार राष्ट्रवादीने तर एकला चलो रे चे सूतोवाच केले. जागा वाटपात सन्मान न मिळाल्यास आमचा मार्ग मोकळा राहणार आहे, असे शिवसेनेने आधीच स्पष्ट केले आहे. आता राहिला प्रश्न विरोधकांचा एकेकाळी सोलापूर म्हणजे बालेकिल्ला असलेल्या काँग्रेसची सध्या राजकीय दुरवस्था आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट शहरात दिसायला दणकट पण महापालिकेत नगण्य आहे. ठाकरेंच्या शिवसेनेतील वाद शमण्यास तयार नाही. सोलापुरातील काही राजकीय पक्ष असे आहेत की त्या पक्षात कार्यकर्त्यांपेक्षा नेतेच जास्त आहेत. रस्सी जल गयी मगर बल नही गया या म्हणीप्रमाणे राजकीय ताकद घटल्यानंतरही आपसातील हेवेदावे आणि मतभेद, मनभेद नेते विसरायला तयार नाहीत.



महापालिकेत भाजपा आणि काँग्रेस मोठे भाऊ आहेत. त्यामुळे यांचे वर्चस्व असते. पण या पक्षात देखील सर्वकाही आलबेल नाही. पक्षातील अंतर्गत वाद विकोपाचे आहेत. भाजपमध्ये देखील आमदारांमध्येच सख्य नाही तर काँग्रेसमध्ये एकलशाहीमुळे नाराजांची संख्या मुबलक आहे. शिवसेनेत अंतर्गत वाद मोठे आहेत. राष्ट्रवादीतही तोच प्रकार आहे. महायुती-महाविकास आघाडी झाली नाही तर आरोप-प्रत्यारोपांचे राजकीय स्फोट होणार हे मात्र नक्की. जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये जिल्ह्यात चांगलीच रणधुमाळी पहावयास मिळणार आहे. एकूण ६८ गट आणि १३६ पंचायत समिती गणांसाठी होणाऱ्या निवडणुका रंगतदार होणार आहेत. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये संस्थानिक प्रस्थापित राजकारणी असल्याने यंदाच्या निवडणुकांमध्ये मिनी मंत्रालयाच्या सत्तेसाठी मोठी चुरस असणार आहे. नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकीत राड्यांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

माजी नगरसेवकांसह इच्छुक कार्यकर्ते आस लावून बसलेल्या महापालिका आणि जिल्हा परिषदा निवडणुका येत्या महिन्याभरात होण्याच्या शक्यता बळावल्या आहेत. सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार जानेवारी अखेरीपर्यंत या निवडणुका घेणे निवडणूक आयोगावर बंधनकारक आहे. तीन वर्षांच्या गॅपनंतर या निवडणुका होत असल्याने नवइच्छुकांनाही आता मोठी संधी आहे. नगरसेवक अथवा जिल्हा परिषद सदस्य होण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्यांची संख्या हजारोंवर आहे. नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकीत निवडणुकीच्या मैदानात हजारो उमेदवारांनी आपले नशिब आजमावले असून येत्या २१ डिसेंबरला मतमोजणीनंतर कोण सिकंदर हे स्पष्ट होणार आहे.






### पालकमंत्र्यांची राजकीय खेळी काय असणार याची उत्सुकता

नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत ज्यांचा मोठा प्रभाव होता असे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी काय राजकीय खेळी असणार याची उत्सुकता भाजपासह मित्रपक्ष आणि विरोधकांना लागली. तशी ती लोकांनाही लागली आहे. या निवडणुकीत तरी पालकमंत्री मित्रपक्षांना सोबत घेतात का नाही, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. शहरात भाजपाचे तीन आमदार असल्याने नगरसेवक पदासाठी उमेदवारी देताना पक्षाची दमछाक होणार आहे. तर इकडे जिल्ह्यात भाजपाचे ५ आमदार असून सांगोल्याचे शेकाप आमदार भाजपाचे घट्ट मित्र झाले आहेत. शरद पवार राष्ट्रवादीची सूत्रे मोहिते-पाटील आणि शहराध्यक्ष महेश गादेकर यांच्या हाती असणार आहेत. काँग्रेस खा.प्रणिती शिंदे, राष्ट्रवादीसाठी थेट अजित पवार तर शिवसेना एकनाथ शिंदे आणि उबाठाचे उध्दव ठाकरे निर्णय घेतील असे चित्र आहे.

स्थानिक संस्थांच्या निवडणुकात राजकीय पक्ष आपले चिन्ह सोडून कोणाबरोबरही युती, आघाडी करतात आणि सत्तेची खुर्ची आपल्याकडेच राहील यासाठी साम, दाम, दंड याचा वापर करतात. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमध्ये एकमेव भाजपाने स्वचिन्हावर जास्तीत जास्त ठिकाणी नगराध्यक्ष पदांचे उमेदवार मैदानात उतरविलेले आहेत. त्यामुळे राज्यात भाजपाचीच सरशी होणार यात शंका नाही. पण या निवडणुकींमध्ये झालेले राजकारण पाहता ते महाराष्ट्राच्या राजकारणाला शोभणारे नव्हते, हे मात्र कटूसत्य होय.

केंद्र आणि राज्याच्या सत्तेतील मित्रपक्ष असलेल्यांनी या निवडणुकीत एकमेकांवर चिखलफेक केल्याचे दिसून आले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून असे प्रकार घडल्याने महायुतीत काहीसा बेबनाव असल्याचेही चित्र होते. परंतु निवडणुका संपताच राजकीय नेत्यांनी आपला पवित्रा बदलत निवडणुका संपल्या. आता आपण पुन्हा मित्र असे सांगून लोकांना भ्रमात टाकले. लोक विचार करत आहेत की, लोकशाही देशात मतदाराला खरेच काही महत्व आहे की, निवडणुकांपुरतेच वापर होतो आहे. सर्वोच्च अशा राज्यघटनेने दिलेल्या पवित्र अशा मतदानाच्या अधिकाराचा खरोखर काही उपयोग होतो आहे का, असा प्रश्न सामान्य मतदारांना पडलेला आहे. कारण मतदार मतदान करतो तेंव्हा तो एखाद्या विचाराच्या पक्षाला करतो. पण नंतर मात्र कोण, कोणत्याही पक्षात जातो आणि पुढे वेगळेच राजकारण घडते. त्यामुळे मतदान प्रक्रियेवरील सामान्यांचा विश्वास उडतो की काय अशी परिस्थिती निर्माण होत आहे. यातच भर म्हणजे निवडणूक आयोगाचा कारभार सावळा गोंधळाचा दिसून येतो. मतदार यादीतील प्रचंड घोळ हे थक्क करणारे आहेत. वास्तविक पाहता निवडणूक यादीतील घोळ हे काय आजचे नाहीत, ते वर्षेनुवर्षे चालत आलेले आहेत. परंतु यावेळेस मात्र सर्वच राजकीय पक्षांनी याकडे लक्ष वेधल्याने निवडणूक आयोगाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. निवडणूक यादीतील घोळ, दुबार नावे, मृतांची नावे, छायाचित्रांचा घोळ, एकाच कुटुंबातील सदस्यांची वेगवेगळ्या मतदार केंद्रावर होणारे मतदान, मतदार यादीतून आपोआप नाव गायब होणे अशा अनेक घोळांमुळे यंदा निवडणूक आयोग जास्तच चर्चेत आला आहे. न्यायालयाने देखील आयोगाला झापलेय तर मुख्यमंत्र्यांसह सर्वच राजकीय पक्षांनी आयोगावर नाराजी व्यक्त केली आहे. काहींनी तर जाहीरपणे आयोगाची लाज देखील काढलेली आहे. या सर्व प्रकारानंतर तरी आयोगाच्या कामकाजात सुधारणा होते का आणि निवडणुका पारदर्शी होतील का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# रशियन शस्त्रांचे सुटे भाग भारतातच करणार तयार

## द्विपक्षीय संरक्षण करारात दोन्ही देशांची मंजुरी

◆ **नवी दिल्ली, ६ डिसेंबर**

भारतीय लष्कराकडून वापर होत असलेल्या रशियन बनावटीच्या शस्त्रास्त्रांची भारतातच निर्मिती करण्यास रशियाने मंजुरी दिली आहे. यामुळे शस्त्रांची आयात आणि देखभालीवर होणारा खर्च आणि वेळ वाचणार आहे. उभय देशात झालेल्या द्विपक्षीय संरक्षण करारात याला दोन्ही देशांनी सहमती दर्शविली आहे.



भारत-रशिया यांच्यात द्विपक्षीय संरक्षण करार झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पुतिन यांनी या मुद्यावर चर्चा केली. भारतीय लष्कर मोठ्या प्रमाणात रशियन शस्त्रांचा वापर करते. या शस्त्रांसाठी लागणारे सुटेभाग रशियावरून आयात करण्यात फार वेळ जात होता आणि याचा परिणाम देखभालीवर होत असे. खरेदी प्रक्रियाही किचकट आणि वेळखाऊ होती. गेल्या अनेक वर्षांपासून भारताकडून हा मुद्दा उपस्थित करण्यात येत होता. रशियन बनावटीच्या शस्त्रांच्या निर्मितीसाठी संबंधित तंत्रज्ञान भारताकडे सोपविण्यावर रशियाने मंजुरी दिली आहे. तसेच दोन्ही देश संयुक्तपणे मेक इन इंडिया अंतर्गत या शस्त्रास्त्रांची निर्मिती करणार आहेत, असे संयुक्त वक्तव्यात नमूद करण्यात आले आहे. शस्त्रे आणि सुटेभागांच्या निर्मितीसाठी प्रकल्प स्थापण करणे सोबतच मित्र देशांना शस्त्रांची निर्यात करण्यास भारत-रशिया सहमत झाले आहेत. पुतिन भारतात येण्याच्या एक दिवस अगोदर राजनाथ सिंह आणि आंद्रेई बेलौसव्ह या दोन्ही संरक्षण मंत्र्यांमध्ये द्विपक्षीय संरक्षण सहकार्यावर चर्चा झाली. ◀(वृत्तसंस्था)



### एस-४००, एस-५०० खरेदीत भारताला रस



द्विपक्षीय संरक्षण विषयक चर्चेत भारताने एस-४०० आणि एस-५०० क्षेपणास्त्र प्रणालीच्या खरेदीसाठी उत्सुकता दर्शविली. निर्बंध लादण्याची धमकी अमेरिकेने देऊनही भारताने २०१८ मध्ये एस-४०० खरेदीचा करार केला. तसेच पाचपैकी तीन यंत्रणा भारताकडे सोपविल्या. या चर्चेत भारताने एस-५०० यंत्रणाही खरेदीची इच्छा दर्शविली आहे.

# पाकिस्तान-अफगाणिस्तानात पुन्हा जुंपली

## सीमेवरील भीषण गोळीबारात चार ठार ● कित्येक जखमी

◆ **काबुल, ६ डिसेंबर**

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानात पुन्हा एकदा जुंपली आहे. दोन्ही देशांच्या सैनिकांनी चमन सीमेवर परस्परांवर भीषण गोळीबार केला. यात पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले असून, चार नागरिक ठार झाल्याचा दावा अफगाणिस्तानच्या अधिकाऱ्यांनी केला.



अफगाणिस्तानच्या स्पिन बोल्डक जिल्ह्याच्या गव्हर्नरने गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्यांच्या संख्येला दुजोरा दिला आहे. पाकिस्तानच्या जिल्हा रुग्णालयांत जखमींना दाखल करण्यात आल्याचे वृत्त आहे. मात्र, गोळीबारात कुणीही मृत्युमुखी पडले नाही, असा दावा पाकिस्तानने केला.

बलुचिस्तानच्या सीमेवर गोळीबार केल्याचा आरोप दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांनी परस्परांवर केला. अफगाणी लष्कराने बदानी परिसरात मोर्टारने गोळे डागले, अशी माहिती पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी दिल्याचे 'डॉन' या वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे.

स्पिन बोल्डक परिसरात पाकिस्तानने हल्ला केल्याचा आरोप अफगाण तालिबानचे प्रवक्ते जबीहुल्ला मुजाहिद यांनी केला. आमच्या सैनिकांनी केवळ प्रत्युत्तर दिल्याचे त्यांनी सांगितले.

अफगाणिस्तानने केलेल्या गोळीबाराच प्रत्युत्त दिले. या व्यतिरिक्त चमन-कंधार मार्गावरही गोळीबार झाल्याची माहिती समोर आली. मात्र, त्याला दुजोरा मिळू शकला नाही, असे डॉनने अधिकृत सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### 'आयएसपीआर'चे मौन

रात्री दहा वाजताच्या सुमारास गोळीबार सुरू झाला. तो उशिरापर्यंत सुरू होत. एका महिलेसह तीन जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती चमन जिल्हा रुग्णालयाच्या अधीक्षकाने दिली. मात्र, पाकिस्तानी लष्कराची माध्यम शाखा आयएसपीआर किंवा परराष्ट्र कार्यालयाने या मुद्यावर कोणतेही अधिकृत वक्तव्य दिलेले नाही.

### कुनो राष्ट्रीय उद्यानात चित्त्याच्या शावकाचा मृत्यू

**श्योपूर (मध्यप्रदेश), ६ डिसेंबर**

मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात जंगलात सोडण्यात आलेल्या एका चित्त्याच्या शावकाचा मृत्यू झाला आहे, असे वन अधिकाऱ्यांनी सांगितले.

गुरुवारी आंतरराष्ट्रीय चित्ता दिनानिमित्त मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी मादी चित्ता वीरा व तिच्या दोन पिल्लांना उद्यानाच्या मुक्त क्षेत्रात सोडले. रात्रीच्या वेळी आई व भावंडांपासून वेगळे झालेले शावक काही तासांनी मृतावस्थेत आढळले. हे शावक दहा महिन्यांचे होते.

शवविच्छेदन अहवाल मिळाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. वीरा व तिचे दुसरे पिल्लू एकत्र असून ते चांगले आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# 'बब्बर खालसा'चा निधी गोठवला, संपत्ती जप्त

### ब्रिटन सरकारचा दणका

◆ **लंडन, ६ डिसेंबर**

ब्रिटन सरकारने प्रथमच खलिस्तानी दहशतवादी संघटना बब्बर खालसावर थेट कारवाई करीत संघटनेवर आर्थिक प्रतिबंध लादले. संघटनेचे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. या माध्यमातून बब्बर खालसाला मिळणारी आर्थिक मदत रोखण्यात आली. ही कारवाई देशांतर्गत दहशतवादविरोधी व्यवस्थेच्या अंतर्गत करण्यात आली.



ब्रिटनमधील शीख व्यावसायिक गुरप्रीतसिंग रेहलवर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती यूके ट्रेझरी विभागाने दिली. भारतात दहशतवादी कारवाया करणाऱ्या संघटनांसोबत जुळलेला असल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला आहे. त्याच्या कित्येक संपत्ती गोठवण्यात आल्या तसेच त्याला कंपनी संचालकाच्या पदासाठी अयोग्य असल्याचे घोषित करण्यात आले. यामुळे रेहल कोणत्याही कंपनीचा संचालक बनू शकणार नाही किंवा कंपनी चालवू शकणार नाही. याच प्रकरणात ब्रिटिश सरकारने बब्बर अकाली रेहल समूहाच्या विरोधात संपत्ती जप्तीचा आदेश जारी केला. हा समूह देखील बब्बर खालसाला भरती, शस्त्रास्त्र खरेदी आणि निधी उभारणीसारख्या कारवायांमध्ये सहभागी होता.

आम्ही ब्रिटनच्या आर्थिक प्रणालीचा वापर दहशतवाद्यांना करू देणार नाही. दहशतवादासाठी निधी उपलब्ध करून देणारे जाळे उद्ध्वस्त आम्ही करणार असल्याचे या प्रयत्नातून दिसून येते. कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याचे आणि हिंसाचारात ठामपणे उभे राहण्याचे प्रयत्न या माध्यमातून दिसून येत आहेत. हिंसाचार घडवणाऱ्या कारवायांच्या विरोधात आमची कठोर भूमिका आहे, असे ब्रिटनमधील आर्थिक सचिव लुसी रिग्बी यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

### दहशतवाद विरोधी कायद्यांतर्गत कारवाई

ब्रिटनने ही कारवाई दहशतवाद विरोधी (प्रतिबंध) कायदा-२०१९ च्या अंतर्गत केली आहे. या कायद्याच्या अंतर्गत दहशतवादी कारवायांशी संबंधित व्यक्ती किंवा संघटनांची संपत्ती गोठवण्याचा किंवा त्यांच्यावर आर्थिक प्रतिबंध लादण्याचा अधिकार तपास यंत्रणांना मिळतो. महत्त्वाचे म्हणजे बब्बर खालसाला यापूर्वीच दहशतवादी संघटना घोषित करून त्यावर प्रतिबंध लादण्यात आला आहे.

## चित्रपट वार्ता

### राम गोपाल वर्माने केले उर्मिलाचे कौतुक



**मुंबई** : राम गोपाल वर्माने अलिकडेच उर्मिला मातोंडकरचे कौतुक केले. उर्मिला ही अतिशय टॅलेंटेड आणि व्हर्सेटाइल अभिनेत्री आहे. म्हणूनच मी तिच्यासोबत अनेक वर्षे काम करीत राहिलो. मी अमिताभ बच्चनसोबतही बरेच काम केले आहे, पण त्यांच्या बाबतीत कोणी नाती जोडत फिरत नाही. 'गन्स ॲण्ड थाईज : द स्टोरी ऑफ माय लाईफ' या पुस्तकातही उर्मिलाबद्दल मनमोकळेपणाने लिहिले आहे. 'मेरी जिंदगी की औरतें' या विभागात त्यानी उर्मिलाने खोलवर छाप पाडली असल्याचे नमूद केले आहे. उर्मिला ही माझ्या आयुष्यातील ती व्यक्ती होती, जिने माझ्यावर मोठा परिणाम केला, असे राम गोपाल वर्माने म्हटले. राम गोपाल वर्माच्या या वक्तव्यानंतर जुन्या आठवणी आणि अफवा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

### सचिन पिळगावकरने वयाच्या नवव्या वर्षी घेतली गाडी



**मुंबई** : मराठी अभिनेता सचिन पिळगावकरने वयाच्या नवव्या वर्षी गाडी विकत घेतली. ही माहिती त्याने स्वतःच एका मुलाखतीत दिली. नऊ वर्षांचा असताना गाडीही चालवायला शिकल्याचे सांगितले. मी नऊ वर्षांचा होतो. त्यावेळी आताचा हा सी-लिंक नव्हता. मी तेव्हा टायकलवाडी इथे राहायचो. टायकलवाडी शिवाजी पार्क इथे येते. मी नऊ वर्षांचा होतो, तेव्हा मी पहिली गाडी खरेदी केली. तिला मॉरिस मायनर बेबी हिंदुस्थान म्हणायचे. या गाडीला बकेट सीट आणि फ्लोअर शिफ्ट गिअर होते. ही पेट्रोलवर धावणारी गाडी होती. तुम्ही ती गाडी चालवायचे कशी, असे विचारले असता सचिन म्हणाला, नाही ड्रायव्हर होता. पण, मी नऊ वर्षांचा असताना, याच वरळी सीफेसवर गाडी चालवायला शिकलो.



**अरुणाचल प्रदेशात हुतात्मा झालेले ग्रेनेडियर रेजिमेंटच्या १० व्या बटालियनचे मुकेश कुमार यांची बहीण ज्योतीचा विवाह सांबा येथे शनिवारी पार पडला. यावेळी बटालियनच्या सर्व जवानांनी लष्करी पोशाखात विवाहाला हजेरी लावली.**

### कार-ट्रकच्या धडकेत ५ ठार

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

सही/-
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**जाहीर नोटीस**

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- अर्जदार/वादी
विरुध्द
योगेश नरहरी टोणपे वगैरे -- जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ७९/२०२५ | १) योगेश नरहरी टोणपे, वय-२८, धंदा-हॉटेल, रा. करमाळा रोड, कुटे वस्ती टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर | ६,४६,९२८ | २६/१२/२०२५ |
| २ | ७९/२०२५ | २) नरहरी विष्णू टोणपे, वय-६२, धंदा-शेती, रा. शिराळ (मा) ता. माढा, जि. सोलापूर | ६,४६,९२८ | २६/१२/२०२५ |
| ३ | ७९/२०२५ | ३) जोतीराम शंकर पाटील, वय-४४, धंदा-मार्बल शॉप, रा. करमाळा रोड टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर | ६,४६,९२८ | २६/१२/२०२५ |
| ४ | ७९/२०२५ | ४) समाधान बाळासाहेब पाटील, वय-३५, धंदा-शेती, रा. करमाळा रोड, पाटील वस्ती, टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर | ६,४६,९२८ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ व २ यांचे नोटीस बजावणीबाबत रिपोर्ट आला नाही व प्रवादी नं. ३ व ४ ची नोटीस अपुरा पत्ता** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

सही/-
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**जाहीर नोटीस**

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- अर्जदार/वादी
विरुध्द
पांडुरंग महादेव कासवेद वगैरे -- जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ८२/२०२५ | १) पांडुरंग महादेव कासवेद, वय-४३, धंदा-मेन्स पार्लर, रा. सुर्ली रोड, टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर | ५,४६,७०० | २६/१२/२०२५ |
| २ | ८२/२०२५ | २) महादेव बाबू कासवेद, वय-७९, धंदा-शेती, रा. व्होळे खुर्द ता. माढा, जि. सोलापूर | ५,४६,७०० | २६/१२/२०२५ |
| ३ | ८२/२०२५ | ३) तुषार दत्तात्रय हवालदार, वय-२६, धंदा-मेन्स पार्लर, रा. दहीवली टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर | २,५५,६४० | २६/१२/२०२५ |
| ४ | ८२/२०२५ | ४) श्रीमंत महादेव कासवेद, वय-५२, धंदा-मेन्स पार्लर, रा. व्होळे (खुर्द) ता. माढा, जि. सोलापूर | २,५५,६४० | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ याची नोटीस अपूर्ण पत्ता कारणाने परत व प्रवादी नं. २ ते ४ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

सही/-
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**जाहीर नोटीस**

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- अर्जदार/वादी
विरुध्द
राहूल नंदकिशोर खैरमोडे वगैरे -- जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ८१/२०२५ | १) राहूल नंदकिशोर खैरमोडे, वय-३४, धंदा-फॅब्रिकेशन, रा. शुक्रवार पेठ, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर | २,५५,६४० | २६/१२/२०२५ |
| २ | ८१/२०२५ | २) शरद बंडू गुजले, वय-३७, धंदा-फॅब्रिकेशन, रा. टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर | २,५५,६४० | २६/१२/२०२५ |
| ३ | ८१/२०२५ | ३) राजू बाळकृष्ण खैरमोडे, वय-२७, धंदा-मिठाई शॉप, रा. शुक्रवार पेठ, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर | २,५५,६४० | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ ते ३ यांची नोटीस अपुरा पत्ता** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

सही/-
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

# जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे सर्व 'रेकॉर्ड' येणार एका क्लिकवर

## सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन करण्याचे काम सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ डिसेंबर -**

शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवासंबंधी सर्व नोंदी पूर्णपणे डिजिटल होणार आहेत. 'महा ई-ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट सिस्टिम' या प्रणालीअंतर्गत प्रशासकीय विभागांतील नव्या कर्मचाऱ्यांच्या भौतिक सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन सुरू होत आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेम धील कर्मचाऱ्यांचे नियुक्तीपासून सेवानिवृत्तीपर्यंतचे सर्व सेवाविषयक व्यवहार एकाच प्रणालीद्वारे एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या सर्व विषयांच्या फाइल्समध्ये एकसूत्रता यावी, कोणतीही फाइल व प्रकरण गहाळ होऊ नये, या उद्देशाने जिल्हा परिषदेने ई-ऑफिस प्रणाली सुरू केली आहे. शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती, बढती, प्रशिक्षण, रजा, वेतनवाढ आणि इतर सेवा-संबंधित तपशील यांचा एकत्रित आणि अधिकृत दस्तऐवज यांचा समावेश सेवापुस्तिकेत असते. डिसेंबर अखेरपर्यंत सर्व दस्तऐवजांचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे.

सेवापुस्तकांच्या डिजिटायझेशनमुळं वेतन, प्रमाणपत्रे, पेन्शन वेळेवर मिळणार आहे. जिल्हा परिषदेने वर्ष २०११ मध्ये सेवापुस्तक ऑनलाइन केले होते. मात्र, पुढे त्याचा वापर योग्य पध्दतीने होऊ शकला नाही. मात्र, आता शासनस्तरावरून सेवापुस्तकांचे डिजिटायझेशन होत असल्याने भविष्यात कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मागील काही दिवसांपासून सामान्य प्रशासन विभागाकडून डाटा एन्ट्रीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

### माहिती राहणार गोपनीय

सीईओ कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भौतिक सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन करण्याचे काम सुरु आहे. डिसेंबरअखेरपर्यंत हे काम पूर्ण करणार आहोत. या नव्या प्रणालीतील माहिती गोपनीय राहणार आहे, असे जि.प.सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी सांगितले.

### जिल्हा परिषदेतील वर्गनिहाय कर्मचारी

वर्ग क ११९१८
वर्ग ब ६६९
वर्ग ड ६११
एकूण १३१९८

# 'त्या' महापालिका अधिकाऱ्यांचे निलंबन टाळून बदली केली : डॉ.ओमप्रकाश शेटे

## 'आयुष्मान'साठी हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांना दिला कारवाईचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार सुरु असलेल्या आयुष्यमान भारत योजनेसाठी सोलापूर महापालिका प्रशासनाची व योजनेच्या जिल्हा समन्वयकांची कामगिरी असमाधानकारक दिसून आली होती. असा प्रकार दोन-तीन वेळा निदर्शनास आल्याने महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे यांना खडे बोल सुनावले. त्या अधिकाऱ्याचे निलंबनच करणार होतो. मात्र सहानुभूतीने विचार करून त्या अधिकाऱ्याची शुक्रवार, दि. ५ डिसेंबर रोजी बदली केली असल्याची माहिती आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी दिली.

आयुष्यमान भारत उपक्रमाचे राज्य मिशनचे अध्यक्ष डॉ. शेटे यांनी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद घेवून मनपा अधिकाऱ्यांच्या आयुष्मान भारत योजनेच्या कामकाजाबाबतची पोलखोल केली होती. सोलापूर ग्रामीणमध्ये ही योजना चांगल्या प्रकारे राबतेय. मात्र शहरातील नागरिकांसाठी मनपा अधिकारी नीट काम करीत नसल्याची त्यांची खंत होती. मनपाचा एकही कर्मचारी, अधिकारी बैठकीस उपस्थित नव्हता. यावरुन ते चांगलेच संतापले होते. भविष्यात आयुष्मान योजनेच्या कामात हयगय करणाऱ्या इतर अधिकाऱ्यांनाही सोडणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

सध्याही शहरातील अनेक सामान्य नागरिकांना काही रूग्णालयातून या योजनेचा लाभ मिळत नाही, हे वास्तव आहे. अशा रुग्णालयांबाबत तक्रारी आल्यास त्यांच्यावरही शासन स्तरावरून कडक कारवाई करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शुक्रवार,दि.५ डिसेंबर रोजी डॉ. शेटे सोलापूर दौऱ्यात आल्यानंतर त्यांनी जिल्हा समन्वयक दिपक वाघमारे यांच्यावरील कारवाईबाबत सविस्तर माहिती घेतली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांवर कसलीच कारवाई झाली नसल्याचे त्यांना समजले. तेव्हा त्या अधिकाऱ्याची बदली केल्याचे डॉ.शेटे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना सांगितले.

आयुष्यमान भारत योजनेचा राज्याचा अध्यक्षपदाचा पदभार घेतल्यापासून डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी सोलापुरात तीन वेळा बैठका घेतल्या. पहिल्या व दुसऱ्या बैठकीस महापालिका प्रशासनाची कामगिरी सुमार दिसली. तिसऱ्या बैठकीस महापालिका प्रशासनाचा एकही प्रतिनिधी उपस्थित नव्हता. योजनेसाठी आवश्यक क्षमतेने गती न दिल्याने या योजनेचे जिल्हा समन्वयक दिपक वाघमारे यांची नंदूरबारला बदली करण्याचा निर्णयही घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

### उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांवर कडक कारवाई

सर्वसामान्य, गोरगरिब रुग्णांवर मोफत उपचार होण्यासाठी शासनाची आरोग्य योजना कार्यान्वित आहे. सोलापुरातील अनेक मोठ्या हॉस्पिटलमध्ये अशा योजना लागू असताना सुध्दा लाभार्थी रुग्णांवर मोफत उपचार केले जात नसल्याच्या तक्रारी अनेक संघटनांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे उपचार नाकारणाऱ्या रुणालयांवरही कडक कारवाई करण्याचा इशारा डॉ.ओमप्रकाश शेटे दिला आहे.



# कांदा बाजारपेठ बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ डिसेंबर**

### डॉ.आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी माथाडी कामगार चैत्यभूमीत दाखल

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत असणाऱ्या विविध माथाडी कामगार संघटनांनी आज शनिवार दि.६ डिसेंबर रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई येथील चैत्यभूमीला बाबासाहेबांच्या दर्शनासाठी दाखल झाल्याने सोलापूर बाजार समितीमधील कांदा बाजार पेठ एक दिवसासाठी बंद ठेवण्यात आली. एक दिवसाच्या बंदमुळे बाजार समितीचे लाखोंचे उत्पन्न तसेच कोटींची उलाढाल ठप्प झाली. दरम्यान, कामगार संघटनांच्या निवेदनाद्वारे सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील कांदा बाजारपेठेला एक दिवस सुट्टी देण्यात आली. रविवारी साप्ताहिक सुट्टी असल्याने सोमवारी बाजारपेठ सुरळीत होईल अशी माहिती बाजार समिती प्रशासनाने दिली. एरवी गजबजलेली कांदा बाजारपेठ शनिवारी पूर्णतः बंद ठेवल्यामुळे सर्वत्र शुकशुकाट पहावयास मिळाला.



महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे आणि अन्य शिवसैनिक.

# सोलापूर महानगरपालिका निवडणूकसंदर्भात भाजपची आज बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**



सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या वतीने रविवार, दि.७ डिसेंबर २०२५ रोजी सिव्हील चौक परिसरातील भाजपा कार्यालय येथे महत्वाची बैठक बोलाविण्यात आली आहे, असे सांगण्यात आले.

सोलापूर महानगरपालिका निवडणूक प्रमुख रघुनाथ कुलकर्णी, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी प्रभागनिहाय रणनीती, संघटनात्मक बांधणी, आगामी निवडणूक मोहिमेची प्राथमिक रुपरेषा याविषयी माहिती देणार आहेत. याबाबत चर्चा करण्यासाठी घेण्यात आलेल्या बैठकीस सरचिटणीस प्रा.डॉ.नारायण बनसोडे, डॉ.शिवराज सरतापे, उपाध्यक्षा विजया वड्डेपल्ली, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा रंजिता चाकोते, सर्व पदाधिकारी, मोर्चा-आघाडी सेल प्रमुख, मंडल अध्यक्ष उपस्थित होते.

# मनोरमा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी श्रीकांत मोरे

**मसाप पुणे पश्चिम शाखा; मनोरमा साहित्य मंडळीच्या वतीने २५ डिसेंबरला संमेलन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर व मनोरमा साहित्य मंडळी, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरात दि.२५ डिसेंबर रोजी होणाऱ्या एकदिवसीय मनोरमा मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे यांची एकमताने निवड करण्यात आली.

कोटणीस नगर येथील मनोरमा कॉन्फरन्स सभागृहात डिजिटल मीडिया संपादक संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष राजा माने यांच्या अध्यक्षतेखाली सभेत एकमताने ही निवड करण्यात आली. यावेळी मनोरमा साहित्य पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष प्रा. राजशेखर शिंदे, मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे, मनोरमा साहित्य मंडळीच्या महिला उपाध्यक्षा अस्मिता गायकवाड यांच्यासह प्रा.डॉ. कविता मुरूमकर, पद्माकर कुलकर्णी, मारुती कटकधोंड, बदिउज्जमा बिराजदार, राजेंद्र भोसले, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, तात्यासाहेब पवार, उमाकांत चौंडे, विजय कालेकर, अभिराम सराफ, शिल्पा कुलकर्णी, कविता कुलकर्णी, नीलकंठ करंडे, पुरुषोत्तम साखरे, सुनील पाटील, संध्या हेब्बाळकर आदी उपस्थित होते. संमेलनाचे अध्यक्ष श्रीकांत मोरे म्हणाले, मराठी भाषेची जननी संस्कृत आहे. तिचा प्रचंड मोठा विस्तार झाला असून ती भाषा आपण जपली पाहिजे. मराठी भाषेला नैतिकतेचे अधिष्ठान आहे. गेल्या २६ वर्षात मनोरमा परिवाराने साहित्य क्षेत्रातील २५० जणांना सन्मानित केले आहे. मराठी भाषेचे संवर्धन आणि जागर झाला पाहिजे. सर्वांच्या सहकार्याने संमेलन यशस्वीरित्या पार पाडू.

यावेळी शोभा मोरे, अस्मिता गायकवाड यांनी आपले विचार व्यक्त केले. प्रा.राजशेखर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. पद्माकर कुलकर्णी यांनी आभार मानले.



### श्रीकांत मोरे यांची साहित्य सेवा अखंड

ज्येष्ठ पत्रकार राजा माने म्हणाले, श्रीकांत मोरे यांची अखंड साहित्य सेवा चालू आहे. गेल्या २६ वर्षाची ही चळवळ असून यामध्ये मोरे यांचे अमूल्य योगदान आहे. त्याचे साहित्य मुक्तछंदामध्ये आहे. कथा, कविता, ललित लेखन या सर्व प्रकारात त्यांचे नैपुण्य आणि गुणवत्ता आहे. कुठलीही अपेक्षा न ठेवणारा हा माणूस बँकेचे कामकाज सांभाळून मराठी साहित्य क्षेत्रात सेवा करत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड व्हावी, अशी योग्यता त्यांच्याजवळ आहे.

# रेल्वे ब्रिज पूर्णपणे बंद; पोलिसांनी काढले पर्यायी मार्गाचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.६ डिसेंबर-**

भय्या चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते मरिआई चौक दरम्यानचा रेल्वे ब्रिज जुना व जीर्ण झाल्याने तो पाडून त्याजागी नवीन ब्रिज उभारण्याचे काम हाती घेण्यात येत आहे. वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्याने हा मार्ग संपूर्णपणे वाहतुकीसाठी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सोलापूर शहराचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ मधील अधिनियम २२ व कलम ३३(१)(ब) नुसार जारी केलेल्या आदेशानुसार दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी ००.०१ वाजेपासून ते ८ डिसेंबर २०२६ रोजी २४.०० वाजेपर्यंत या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात येणार आहे.

सोलापूर शहरातून लोकशाहीर आण्णाभाऊसाठेयांच्यापुतळ्यापासून मरिआई चौकाकडे जाताना १९२२ मध्ये बांधलेला रेल्वेचा जुना पूल आहे. त्यावेळी मंगळवेढा ते पंढरपूर आणि कोल्हापूरच्या अन्य शहरांना जोडण्यासाठी पूल बांधला होता.

१०३ वर्षे जुना फुल सध्या वाहतुकीसाठी धोकादायक असुरक्षित झाला आहे. त्यामुळे १४ डिसेंबर रोजी तो पाडण्यात येणार आहे त्यासाठी आधुनिक हायड्रोलिक ब्रेकर, कॉंक्रीट क्रशर आणि कटिंग मशीन वापरून हा पूल तोडला जाणार आहे त्यामुळे या मार्गावरील पूर्ण वाहतूक दुसरीकडून वळविली आहे. सुरुवातीला काही दिवस पर्यायी मार्गावर सोलापूर शहर पोलिसांची अंमलदार वाहतूक निर्माण करणार आहेत. पोलीस आयुक्तांनी जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### चारचाकी व दुचाकी वाहनांसाठी हे आहेत चार पर्यायी मार्ग

१) मरिआई चौक ते एसटी स्टँड रोड : या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या दुचाकी, चारचाकी वाहनांसाठी मरिआई चौक-शेटे नगर रेल्वे बोगदा-खमितकर अपार्टमेंट, एमएसईबी ऑफिस-निराळे वस्ती-छत्रपती शिवाजी महाराज चौक ते एसटी स्टँड.

२) मरिआई चौक ते रेल्वे स्टेशन रोड : मरीआई चौक-नागोबा मंदिर-रामवाडी पोलीस चौकी-रामवाडी दवाखाना-रामवाडी ग्रीन गोडाऊन-मोदी बोगदा-जांबुमुनी चौक-मोदी चौक-कुमार चौक रेल्वे स्टेशन.

३) मंगळवेढा रोड : मंगळवेढाहून-हैदराबाद- तुळजापूर-विजयपूर-पुण्याकडे जाणाऱ्या वाहनधारकांना व या रोडने मुंबई मंगळवेढ्याकडे जाणाऱ्या वाहनचालकांना नवीन विजापूर रोड ते केगाव बायपासचा वापर करता येईल.

४) देगाव व दमाणी नगर : देगाव व दमाणी नगर परिसरातील रहिवाशांना सोलापूर शहरात ये-जा करण्यासाठी जगताप हॉस्पिटल-सीएनएस हॉस्पिटल-जानकर नगर-नवीन रेल्वे बोगदा-अभिमानश्री नगर-अरविंदधाम वसाहत-जुना पुना नाका ते इच्छितस्थळी जाता येईल.

# निराळे वस्तीत आज शासकीय योजनांचे शिबीर

**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**

सुमित भोसले मित्र परिवार आणि जयहिंद लोकचळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभाग क्रमांक ७ मधील सर्वसामान्य नागरिकांसाठी रविवार, ७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता निराळे वस्ती येथील जुने विठ्ठल मंदिर येथे शासकीय योजनांविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेची ई-केवायसी, 'आयुष्यमान भारत' कार्ड, 'प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजना, कामगारांसाठी 'ई-श्रम कार्ड' यांसारख्या महत्त्वाच्या योजनांचे फॉर्म मोफत भरुन दिले जाणार आहेत, **दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने** यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात येणार आहे, असे संयोजक जयहिंद चळवळीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुमित भोसले यांनी सांगितले.



# मेहता शाळेत महापरिनिर्वाण दिन साजरा

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

मेहता प्राथमिक शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न झाला. सर्वप्रथम मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर व प्रमुख अतिथी डॉ. नागनाथ येवले यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिज्योती. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. वशिष्ठ खजुरकर या विद्यार्थ्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वेशभूषा अतिशय हुबेहूब साकारली होती. सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. मधुरा छत्रे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. इयत्ता दुसरी देवगिरी गटातील विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील एक प्रसंग व नृत्य सादर केले. इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी डॉ.आंबेडकरांचे कार्य भाषणाद्वारे सांगितले. रोहिणी मशाळकर यांनी गोष्टीरूपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील प्रसंग सांगितले. शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी देखील कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन मयुरी दुरुगकर यांनी केले. तर आभार सुभाषिनी पिल्ले यांनी मानले.

# मंद्रुप पोलिस ठाणे आयोजित कार्यक्रमात हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**





मंद्रुप पोलिस ठाण्याच्या वतीने दत्त जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन घडले. दरम्यान, मंद्रुपमधील विठाई नगर येथील श्रींच्या पालखीचे आगमन झाल्यानंतर पालखी पूजन करुन भक्तगणांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. मंद्रुप पोलिस ठाणे येथील वटवृक्षाखाली दत्ताची दैनंदिन पूजाविधी केली जायची. मात्र, सुमारे २५ वर्षांपुर्वी विठाई नगर येथे दत्त मंदिराची स्थापना करण्यात आली, असे सांगण्यात आले. मंद्रुप पोलिस ठाणे येथे दरवर्षी दत्त जयंती उत्सव साजरा करण्यात येते. यावेळी सर्व कर्मचारी स्वेच्छेने भक्तांसाठी महाप्रसादाची सोय करतात. गावातील व परिसरातील शेकडो भक्त यात सहभागी होतात. लोकांच्या सहभागामुळे पोलिस कर्मचाऱ्यांना काम करण्याची नवी उर्जा मिळते, असे मंद्रुप पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोज पवार यांनी सांगितले. अनेक वर्षांपासून मंद्रुप पोलिस ठाणे येथे दत्त जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येते. यावेळी पोलीस ठाणे येथे हिंदु मुस्लीमसह सर्व कर्मचारी एकत्र येऊन उत्सवात मग्न होतात. परिसरातील शेकडो भक्तांसाठी महाप्रसादाची उत्तम सोय करण्यात येते. हिंदु मुस्लीम एकतेचे प्रतीक म्हणून या उत्सवाला महत्व आहे, असे दत्त जयंती उत्सव समितीचे प्रमुख राजकुमार आतार यांनी सांगितले.

# व्यापाऱ्याला २ लाख ५१ हजारांचा गंडा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.६ डिसेंबर-**

जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत व्यापाऱ्यांची आर्थिक फसवणूक करणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. 'कृष्णा मार्केटिंग' नावाचे दुकान चालवणाऱ्या संशयित आरोपी विक्रमसिंग राजपुत याने एका व्यापाऱ्यास तब्बल २ लाख ५१ हजार २०१ रुपये गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी शकील रहिम मंगलुर (वय-३४, रा. जोडभावी पेठ, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, २ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी यांच्या घरी पेमेंट संदर्भात चौकशी केली असता आरोपीचा मोबाईल बंद लागत होता. त्यामुळे फिर्यादीने व्हॉट्सअॅपवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर 'कृष्णा मार्केटिंग' या दुकानावर प्रत्यक्ष भेट दिली असता दुकान पूर्णपणे बंद असल्याचे दिसून आले. आजूबाजूच्या व्यापाऱ्यांकडून चौकशी केल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली. आरोपी विक्रमसिंग राजपुत याने अनेक व्यापाऱ्यांकडून माल उचलूनही पैसे न देता दुकान अचानक बंद करून पसार झाल्याचे स्पष्ट झाले

संशयित आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून डब्ल्यूपीसी शीट माल उचलून घेतला आणि त्यानंतर कोणतेही पेमेंट न करता फसवणूक केली आहे. संबंधित प्रकारामुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

## भरधाव कारच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि.६ डिसेंबर-**

हैदराबाद रोडवरील हॉटेल जगदंबा येथे प्रांत विधीसाठी रस्ता ओलांडताना भरधाव आलेल्या चारचाकी कार (क्रमांक एम.एच.१३.इ.एस.२२५०) या चालकाने त्याच्या ताब्यातील कार रस्ता ओलांडणाऱ्या तरुणाला जोरदार धडक दिली आणि त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे. भागवत व्हनमाने (वय-२३) असे मृत तरुणाचे नाव आहे.

याप्रकरणी सत्याप्पा माळाप्पा सोनटक्के (वय-३७, रा.रामपूर, ता.दक्षिण सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी सत्यपाल सोनटक्के याचा चुलत भाचा भागवत व्हनमाने (वय-२३) हा हॉटेल जगदंबा येथे प्रांत विधीसाठी रस्ता ओलांडताना ओलांडत होता. यावेळी भरधाव आलेल्या चार चाकी कारने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने, अतिवेगाने चालवून भाचा भागवत यास धडक देऊन त्यास जखमी करून त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याचे फिर्यादीत नमूद आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आष्टा शिवारातून ५० हजारांचा साहित्य चोरीला



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ डिसेंबर -**
आष्टा (ता. भूम) शिवारातील शेतातील विहिरीजवळ ठेवलेले ५० हजार रुपये किंमतीचे साहित्य अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी राहुल महादेव लोखंडे (वय ३७, रा. आष्टा, ता. भूम) यांच्या गट क्रमांक २६४ मधील शेतातील विद्युत मोटारीसाठी आणलेले आर्मेचर व ट्रॅक्टर स्टॅण्ड असे एकूण ५०,००० रुपयांचे साहित्य २ डिसेंबर रोजी सकाळी ६.०० वाजेपासून ३ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेले.

या बाबत राहुल लोखंडे यांनी ५ डिसेंबर रोजी परंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून भा.दं.वि. कलम ३७९ (चोरी) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला.



## संक्षिप्त वृत्त...



### जागतीक एड्स दिनानिमीत्ताने मुरूममध्ये जनजागृती

**मुरूम, दि.६ डिसेंबर -**
जागतिक एड्स दिनानिमित्त मुरूम शासकीय ग्रामीण रुग्णालयाच्यावतीने ज्युनिअर कॉलेज येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. अडथळ्यावर मात करू, एकजुटीने एचआयव्ही/ एड्स ला लढा देऊ, नव परिवर्तन घडवू या घोषवाक्याने शपथ देण्यात आली. तसेच युवक, युवतींना एचआयव्ही एड्सबद्दल सविस्तरपणे मार्गदर्शन करताना डॉ. महेश बिरादार व समुउपदेशक विजय भोसले यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी गजानन उपासे, प्रसाद इंगोले प्रा. किसन माने तसेच रुग्णालयाचे रवी लोहार, संदीप बाबाळसुरे व महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### लोहारा शहरात दत्तजयंती साजरी

**लोहारा, दि.६ डिसेंबर -**
लोहारा शहरातील महात्मा फुले चौकातील पवित्र उंबराचे वृक्ष असून दत्तजयंतीनिमित्त त्याची मनोभावे भक्तिभावाने विधिवत पूजा करण्यात आली. या धार्मिक उत्साहा सोबतच निसर्ग संवर्धनाचा संदेश देत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगरसेवक विजयकुमार ढगे व मित्र परिवाराच्या वतीने औदुंबर वृक्षाची पूजा करून महाआरती तसेच महाप्रसादाचे वाटप करण्यात आले असुन भाविक भक्तांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन महाआरती व महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी विजयकुमार ढगे, के.डी. पाटील, बसवराज पाटील, माणिक चिकटे, हरी लोखंडे, दगडू तिगाडे, प्रशांत थोरात, वैभव होंडराव, धनराज फरीदाबादकर, प्रमोद पोतदार, पिंटू लोखंडे, अनिरुद्ध जोशी आदींसह भाविक कार्यक्रमात सहभागी झाले होते.



### आर्य चाणक्य विद्यालयात महापरिनिर्वाण दिनी डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**धाराशिव, दि.६ डिसेंबर -**
आर्य चाणक्य प्राथमिक विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका देशमाने एस.जी. उपस्थित होत्या. कार्यक्रमात सहशिक्षक जाधवर पी.जे. यांनी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या जीवन कार्याबद्दल, संविधान निर्मितीतील भूमिकेबद्दल तसेच विद्यार्थ्यांसाठी त्यांनी दिलेल्या प्रेरणादायी विचारांची माहिती दिली.

### सोन्या-चांदीचा ऐवज लंपास

**धाराशिव, दि.६ डिसेंबर -**
तालुक्यातील जकेकुर येथे घरफोडीची घटना घडली असून अज्ञात चोरट्याने घराची कडी तोडून ५५,५०० रुपयांचा सोन्या-चांदीचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी जयश्री पंडीत बिराजदार (वय ६५) यांच्या राहत्या घराची कडी अज्ञात व्यक्तीने ३ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजेपासून ५ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजेदरम्यान कापून आत प्रवेश केला. चोरट्याने कपाटातील १९ ग्रॅम सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने असा एकूण ५५,५०० किंमतीचा ऐवज चोरून नेला. जयश्री बिराजदार यांनी ५ डिसेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# राष्ट्रीय महामार्गालगत घाणीचे साम्राज्य; रस्त्याला आले उकीरड्याचे स्वरुप

## शहरवासीयांची कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ डिसेंबर -**
नळदुर्ग ते रोकडया हनुमान मंदिरापर्यंतच्या सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर प्रचंड प्रमाणात साचलेली घाण, टाकाऊ मांस व मृत कोंबड्यांची पंखे यामुळे या मार्गाला अक्षरशः उकीरड्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले असून महामार्गालगत कचरा टाकणाऱ्यांवर तातडीने कडक कारवाई करावी, अशी मागणी शहरवासीयांकडून जोर धरत आहे.

नळदुर्ग बसस्थानकापासून पुढे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात घाण साचली असून गटारीचे पाणी थेट रस्त्यावर येत आहे. त्यातच मृत कोंबड्यांची पंखे व टाकाऊ मांस टाकल्याने परिसरात असह्य दुर्गंधी पसरली आहे. या घाणीमुळे महामार्गालगत डुकरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून या प्राण्यांमुळे वाहनचालकांसमोर मोठा अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. घाणीच्या डबक्यांमध्ये डुकरे फिरत असल्याने गाळ व कचरा थेट रस्त्यावर येतो. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांची गैरसोय तर होतेच, शिवाय गंभीर आरोग्यधोका निर्माण होऊ शकतो.



नवीन नळदुर्ग बायपास सुरू झाल्यापासून जुन्या महामार्गावरून वाहने अत्यल्प प्रमाणात जात आहेत. जड वाहने क्वचित, तर बसवाहतूक मात्र अद्याप नळदुर्ग मार्गेच सुरू आहे. तरीदेखील राष्ट्रीय महामार्ग विभागाने या मार्गाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे. नळदुर्ग ते अलीयाबाद पुलापर्यंत रस्त्यावर मोठमोठे, जीवघेणे खड्डे पडले असून वाहनचालकांना धोका वाढला आहे. फुलवाडी टोलनाक्यावरून या मार्गाने जाणाऱ्या वाहनांकडून टोल वसूल केला जातो. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती करणे ही राष्ट्रीय महामार्ग विभागाची जबाबदारी असल्याची नागरिकांची भूमिका आहे.

### प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे...

या मार्गावरील कचरा टाकणाऱ्या व्यक्तींवर कडक कारवाई करून भविष्यात असे प्रकार होऊ नयेत, यासाठी दक्षता घेण्याची नागरिकांची मागणी आहे. तसेच नळदुर्गमार्गे गेलेल्या राष्ट्रीय महामार्गाची तात्काळ सफाई व दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे शहरवासीयांनी स्पष्ट केले आहे.

नळदुर्ग हे ऐतिहासिक शहर असून येथील प्राचीन किल्ला पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. मात्र शहराच्या प्रवेशद्वारावरच असे घाणीचे साम्राज्य असल्याने नळदुर्गची प्रतिमा खराब होण्याचा धोका निर्माण झाला आहे. मृत कोंबड्यांची पंखे व टाकाऊ मांस टाकल्या जाणाऱ्या जागेजवळच रोकडया मारुतीचे मंदिर आहे. यामुळे भविष्यात मंदिराचे पावित्र्य बाधित होऊ शकते, अशी नागरिकांची चिंता आहे.

वाऱ्यामुळे मृत पंखे परिसरात उडून जात असल्याने चिकन विक्रेते व पोल्ट्रीधारकांना पंखांची योग्य विल्हेवाट लावण्याचे आदेश द्यावेत, अशीही मागणी होत आहे.

## लिफ्टच्या बहाण्याने सोन्याचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ डिसेंबर -**
बार्शी-लातूर रोडवरील गणेश हॉटेलसमोर लिफ्ट देण्याच्या बहाण्याने एका वृद्ध महिलेला फसवून ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, केशरबाई जनार्धन नागटिळक (वय ७०, रा. जुने रेल्वे स्टेशन, रामलिंग येडशी) या १४ ऑक्टोबर २०२५ रोजी पहाटे ३.३० वाजता बार्शी-लातूर रोडवर पायी जात होत्या. दरम्यान, अज्ञात व्यक्तीने चारचाकी वाहनात लिफ्ट देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडील २० ग्रॅम सोन्याचे दागिने (किंमत ८०,०००) चोरून नेले.

फिर्यादी केशरबाई नागटिळक यांनी ५ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ४२० (फसवणूक), ३७९ (चोरी) व इतर संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# शिक्षकांचे काळ्या फिती लावून आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ डिसेंबर -**
शिक्षकांना टीईटी मधून सूट मिळावी, संच मान्यतेवरील जाचक अध्यादेश रद्द करावा, तसेच जुनी पेन्शन योजना लागू करावी यांसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्ह्यातील खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित शाळांसोबत जिल्हा परिषद व नगरपरिषद शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शुक्रवार (ता.५) रोजी काळ्या फिती लावून कामकाज करत निषेध नोंदवला.

धाराशिव जिल्हा शिक्षक व शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीच्या वतीने आयोजित या आंदोलनाला जिल्हाभरातील शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. १३ फेब्रुवारी २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांसाठी टीईटीची अट रद्द करण्यासाठी राज्य सरकारने पुनर्विचार याचिका दाखल करावी, १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेवरील जाचक शासन निर्णय रद्द करावा, सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, १०-२०-३० आश्वासित प्रगती योजना लागू करणे, शिक्षकांना अशैक्षणिक व ऑनलाईन कामातून पूर्णतः मुक्तता देऊन फक्त अध्यापनाचे काम देण्यात यावे, शिक्षण सेवक योजना बंद करावी, विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान देऊन शिक्षकांची वेठबिगारी थांबवावी, पटसंख्येच्या कारणावरून शाळा बंद न करण्याची हमी द्यावी.

या सर्व मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी मार्फत शासनाकडे पाठविण्यात आले आहे. या निवेदनावर बाळकृष्ण तांबारे, विलास कंटेकुरे, कल्याण बेताळे, उमाकांत कुलकर्णी, बालाजी तांबे, जयपाल शेरखाने, संतोष देशपांडे, रमेश बारसकर, प्रशांत माने, सुखदेव भालेकर, वैजिनाथ सावंत आदींसह अनेक संघटनांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

### आचारसंहितेमुळे मोर्चा स्थगित : उमाकात कुलकर्णी



राज्य कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद उमाकांत कुलकर्णी यांनी सांगितले. आचारसंहितेमुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणारा शिक्षकांचा आक्रोश मोर्चा स्थगित केला आहे. परंतु आचारसंहिता संपताच डिसेंबर अखेर धाराशिव जिल्ह्याचा न भूतो न भविष्यती असा भव्य मोर्चा काढू. वेतनकपातीची पत्रे काढून शिक्षकांवर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला, मात्र शिक्षकांच्या न्यायहक्कांसाठी तो दबाव झुगारून ऐतिहासिक आक्रोश मोर्चा काढला जाईल.

## समता-बंधुता-न्याय हीच खरी दिशा : पोनि. सचिन यादव

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ डिसेंबर -**
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला समतामूलक समाज उभारण्यासाठी प्रत्येकाने कटीबद्ध होणे ही काळाची गरज आहे. ६ डिसेंबर हा केवळ शोक व्यक्त करण्याचा दिवस नसून आत्मचिंतन, आत्मपरीक्षण आणि समाजपरिवर्तनाचा संकल्प करण्याचा दिवस आहे, असे प्रतिपादन नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन यादव यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नळदुर्ग येथे आयोजित अभिवादन सभेत ते बोलत होते. प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजी गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक पत्रकार तथा बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी केले.

या कार्यक्रमाला पोलिस उपनिरीक्षक इश्वर नांगरे, धनराज गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल बापू बनसोडे, विश्वास रणे, अजयकुमार बागडे, योगेश सुरवसे, अमर बनसोडे, बापू दुरुगकर, सुभाष कांबळे, पप्पू कांबळे, सिद्धांत बनसोडे, अनिता रणे, यशोदा बनसोडे, राजेंद्र कांबळे, पांडू शिंदे, ऋषिकेश कांबळे, अतुल बनसोडे, खंडू गायकवाड, आशिष कांबळे, योगेश बनसोडे, संदेश दुरुगकर, नामदेव बनसोडे, प्रकाश बनसोडे, सुजाता लोंढे, सुनंदा सुरवस, उषा दुरुगकर, माजी सैनिक पद्माकर पुजारी, राजरत्न बनसोडे, हमराज कांबळे, वैभव कांबळे, छाया कांबळे यांच्यासह भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मलकापूर जि.प. शाळेत ‘एक पेन, एक वही’ उपक्रमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.६ डिसेंबर -**
कळंब तालुक्यातील मलकापूर येथील जिल्हा परिषद शाळेत महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. यानिमित्त ‘एक पेन, एक वही’ हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना लेखनसामग्रीचे वाटप करण्यात आले.

शनिवारी (दि.६) शाळेच्या प्रांगणात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच रुक्मिणी घोळवे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना सुंदर लोमटे यांनी केली. त्यांनी डॉ. आंबेडकरांचे जीवनकार्य, संघर्ष, विद्यार्थ्यांसाठीचे आदर्श आणि भारतीय संविधानाविषयी सविस्तर माहिती दिली.

यानंतर आंबेडकरी विचारसरणीचे युवक सुधीर पायाळे यांच्या पुढाकारातून ‘एक पेन, एक वही’ अभियान राबविण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पेन व वह्या वाटप करण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक बळीराम भंडारे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षिका नंदिनी गाडे यांनी मानले.

कार्यक्रमास दत्तात्रय लोमटे, आदित्य लोमटे, सुधीर लोमटे, सतीश ओव्हाळ, अजय लेकरवाळे, अभिजीत लोमटे, स्वप्नील घोळवे यांच्यासह अनेक ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंदमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ डिसेंबर -**
अनंत अडचणींचा सामना करूनही जो यशस्वी होतो, तोच खऱ्या अर्थाने इतिहास घडवतो. आजच्या बालकांमध्ये ही अचाट शक्ती आहे, फक्त तिचा योग्य वापर होणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे याचे ज्वलंत उदाहरण असून त्यांच्या प्रेरणेने असंख्य जणांनी यशाची शिखरे गाठली आहेत, असे प्रतिपादन सहशिक्षिका भागीरथी शिंदे यांनी केले.

श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर, उमरगा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार होत्या.

पुढे बोलताना शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या मुलांची अध्ययनाची बैठक व्यवस्था सुधारण्याची गरज आहे.



एकाग्रचित्ताने दररोज फक्त दोन तास अभ्यास केला तरी निश्चित यश मिळू शकते; मात्र त्याची सातत्याने अंमलबजावणी करणे हेच खरे यशाचे गुपित आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन समीर देशपांडे (प्रमुख, सांस्कृतिक विभाग) यांनी केले.

## जयप्रकाश विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ डिसेंबर -**
महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना क्रांतीसूर्य का म्हटले जाते, याची जाणीव त्यांच्या महान कार्यातून होते. त्यांच्या विचारांचे पालन केल्यास जीवन अधिक सुंदर व अर्थपूर्ण बनते, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास अण्णा कोळगे यांनी जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे आयोजित महापरिनिर्वाण दिन कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणातून केले.




कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफळ अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविक करताना प्राचार्य जयप्रकाश कोळगे म्हणाले की, भारतीय संविधान रचण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निभावलेली भूमिका अत्यंत मोलाची आहे. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा मूलमंत्र विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेऊन देशोन्नतीसाठी कार्य करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा

**उमरगा येथील २ रे सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर**
**जि. धाराशिव (उस्मानाबाद) यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५२७/२०२५** **निशाणी क्र. ०७**
**झुंबर / निरंक**

ज्यापेक्षा मयत **कै. चंपाबाई व्यंकट सुरवसे** हया **रा. चिंचोली (भु) ता. उमरगा जि. धाराशिव दिनांक ११/११/२०२३** रोजी किंवा त्यासुमारास मौजे. रा. चिंचोली (भु) ता. उमरगा जि. धाराशिव, येथे मयत झाले असून अर्जदार **क्र. १. तात्याराव व्यंटराव सुरवसे (मुलगा), २. झुंबर व्यंकट सुरवसे (मुलगा), ३. पार्वती श्रीमंत माने (मुलगी), ४. हारुबाई अंबादास सुरवसे (मुलगी)** यांनी ह्या कोर्टात सदरहू नयत कै. चंपाबाई व्यंकट सुरवसे यांच्या नावचे वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदारास सदरहू प्रमाणपत्र हे कै. चंपाबाई व्यंकट सुरवसे यांचे मृत्यू पश्चात कार्यालयीन कामाकाजाकरिता अर्जदारांचे नावे वास्सा हक्काने नावे लावणेकामी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सदरहू अर्जदार मयत **कै. चंपाबाई व्यंकट सुरवसे** यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याचा सदरहू मयत **कै. चंपाबाई व्यंकट सुरवसे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देईल.
**दिनांक ११/०८/२०२५ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**
**पुढील नेमलेली तारीख १६/०१/२०२५**

**स्वाक्षरित/-**
**(सी.एम. रणदिवे)**
**वरिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**(अ.ज. सय्यद)**
**सहा.अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, उमरगा**



## जाहीर सुचना

याद्वारे नागरिकांना सुचना देण्यात येते की, **श्रीमती आशा सुनिल भोसले** हया खालील परिशिष्टात वर्णन केलेलया मिळकतीच्या (जिचा उल्लेख सदर मिळकत केलेला आहे) मालक असुन सदर मिळकत त्यांच्या ताब्यात व कब्जेवहिवाटीत आहे सदर मिळकत ही **श्रीमती आशा भोसले** यांनी माझे अशिलांना कायम फरोक्त खरेदीखताने विकण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. माझे आशिल यांनी मला सदरहू मिळकतीचे श्रीमती आशा सुनिल भोसले यांचे असलेले नामनिर्देश हे तपासण्यास सांगितले आहे.

तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकत अगर त्यांचे पैकी कोणत्याही भागाबाबत विकी, गहाणपत्र, भाडेकरार, अभिहस्तांतरणपत्र, न्यास, देणगी, लिअन, हवाला, ताबा, सुविधाधिकार, वारसाहक्क, विकसनाचे हक्क, सामंजस्य करार वा इतर कुठलाही करार याद्वारे किंवा सदर मिळकतीत कोणत्याही प्रकारचा काही हक्क हितसंबध, हिस्सा वा अधिकार असल्यास अशा व्यक्तींनी तो लेखी स्वरुपात कागदपत्रांसकट, पुराव्यासकट निम्नस्वाक्षरीकाराकडे पत्ता ३, गिरीराज सोसायटी, गोखले रोड, नौपाडा, स्टेट बँक ऑफ इंडिया जवळ, ठाणे पश्चिम, तालुका व जिल्हा ठाणे ४००६०२ येथे सदर जाहिर नोटीस आजच्या तारखेपासुन १४ दिवसांत सादर करावा. अन्यथा सदर मिळकतीवर अन्य कोणत्याही प्रकारे हक्क, क्लेम, अधिकार वा बोजा नाही व असल्यास त्यांनी तो जाणुनबुजुन सोडुन दिल्याचे किंवा मागे घेतल्याचे समजण्यात येईल.

**परिशिष्ट**

जिल्हा रजि. नोंदणी तुकडी धाराशिव पोट तुकडी व ता. तुळजापुर पैकी मोजे तामलवाडी येथील जिल्हा परिषद धाराशिव ता. पंचायत समिती तुळजापुर पैकी मोजे तामलवाडी येथील स्थावर मिळकत खालीलप्रमाणे -

| गट क्रमांक | एकूण क्षेत्र (हेक्टर. आर.) | मालकीचे क्षेत्र |
|---|---|---|
| ११४ | ४ हे. ४५ आर. | ४ हे. ४५ आर. |
| २१० | ५ हे. १० आर. | ०. हे. ५८ आर. |
| २११ | ७ हे. ९९ आर. | ०. हे. ३८ आर. |

**दिनांक**

**स्वाक्षरित /-**
**श्री. ए.ए. नाडकर्णी,**
**ॲडव्होकेट**
**मो.क्र. ९८९२००७०११**
Email-amitabhnadkarnigmail.com

# निलंगा बस आगाराच्या ढिसाळ नियोजनामुळे प्रवाशांना मनस्ताप

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, ६ डिसेंबर :** निलंगा बस आगाराच्या बसस्थानकातील बसचे वेळापत्रक कोलमडले आहे. प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे

### बसच्या वेळापत्रकाचा उडाला बोजवारा

प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. निलंगा बस डेपोच्या प्रशासनाविरोधात प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

निलंगा बस डेपोची प्रवासी सेवा अक्षरशः कोलमडली असून वेळापत्रकाचा थोडा नाही तर पूर्ण बोजवारा उडाला आहे. दररोज निर्धारित वेळेवर बस न सुटणे, काही बस मार्गातच गायब होणे, तर काही बस थेट इतर मार्गावर वळवणे या सर्व प्रकारांनी प्रवाशांचा संयम तुटला आहे.

डेपो व्यवस्थापनाच्या निष्क्रियतेमुळे प्रवासी आज अक्षरशः राम भरोशावर प्रवास करत आहेत. प्रवाशांनुसार, कोणत्या बसला किती वेळ लागणार, ती कोणत्या मार्गावर जाणार, चालक आला का नाही याचा कोणालाच पत्ता नसतो. वाहतूक नियंत्रकांकडून मिळणारे उत्तर एकच बस येईल थांबा. बाहेरच्या आगारातून निलंगा बस स्थानकात येणाऱ्या व जाणाऱ्या बस ची वेळ बसस्थानकातील नियंत्रकांकडून प्रवाशांना व्यवस्थित सांगितले जात नाही.



या ढिसाळ कारभाराचा फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसत आहे. विद्यार्थी गाड्या न मिळाल्यामुळे उशिरा शाळा-कॉलेजात पोहोचत आहेत.महिलांना बस थांब्यावर तासन्तास बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. शेतकरी आणि मजुरांचे काम विस्कळीत झाले आहे. रुग्णांना वेळेत इस्पितळात जाणे कठीण झाले आहे. बस सेवेसारख्या मूलभूत सुविधेत हा गोंधळ सुरू असेल, तर ग्रामीण भागातील जनतेची अडचण किती गंभीर आहे, हे सहज दिसून येते.

निलंगा डेपोतील बस चालक वाहक नियंत्रक याघावर प्रमुख यात कोणताच ताळमेळ दिसून येत नाही त्यामुळे एकाच वेळेस एकाच मार्गावर जाणाऱ्या चार चार गाड्या फलाटावर लागतात व त्यानंतर तास दोन तास गाड्याच फलाटावर लागत नाहीत अशी स्थिती निलंगा बस स्थानकात दिसून येत आहे.

निलंगा-बसपूर, निलंगा-उमरगा, निलंगा-औराद, निलंगा-लातूर यांसह सर्व मुख्य मार्गांवर बस वेळापत्रकात ताळमेळ राहिलेलेच नाही. निलंगा डेपोमध्ये चालक वाहक संख्या पुरेशी नाही का? चालक-वाहक वेळचे बंधन पाळत नाहीत का? वेळापत्रकाचे नियोजन कोण पाहतो? डेपो प्रशासन नेमके काय करतं तरी काय? असा प्रश्न प्रवाशांकडून केला जात आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या या गोंधळामुळे प्रवाशांचा राग टोकाला पोहोचला आहे. आता निर्णय घ्या; अन्यथा आम्हीही कठोर पाऊल उचलू,व आंदोलन करण्याचा इशारा प्रवाशांकडून देण्यात आले आहे. बस वेळापत्रक सुरळीत केले नाही, तर प्रवाशांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

प्रवासी सेवा ही राज्य परिवहनची सर्वात मूलभूत जबाबदारी असून निलंगा डेपोच्या अकार्यक्षमतेमुळे प्रवाशांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले आहे.

# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी 'प्रेमनाथ'च्या प्रयोगाची निवड



**त.भा. वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, ६ डिसेंबर :** येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यात ३५ शाळांनी सहभाग घेतला होता. या प्रदर्शनात माध्यमिक व उच्चमाध्यमिक गटातून तालुक्यातील थेरगाव येथील श्री प्रेमनाथ विद्यालयातील सोनवणे कार्तिक या विद्यार्थ्याने सादर केलेला प्रयोग तालुक्यातून पहिला आला.

या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षक व्ही. एस.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली लाय फाय डेटा ट्रान्स्फर तंत्रज्ञान हा प्रयोग सादर केला. या प्रयोगात कोणत्याही प्रकारचे इंटरनेट न वापरता कोणताही डेटा सहज दुसऱ्याला पाठविता येतो. त्यामुळे सायबर गुन्हे सहज कमी करता येऊ शकतात हा उत्कृष्ट प्रयोग सादर केला. त्यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मुख्याध्यापक घटकार होते तर प्रमुख पाहुणे गटशिक्षण अधिकारी अनिल पागे हे होते.

या वेळी केंद्रप्रमुख वाघमारे, बिडवे, सुनील गायकवाड, हस्मी, नाईकवाडी उपस्थित होते. गटशिक्षण अधिकारी अनिल पागे यांच्या हस्ते सोनवणे कार्तिक व विज्ञान शिक्षक व्ही. एस. पवार यांना प्रमाणपत्र व पदक देण्यात आले.

दरवर्षी आपल्या विज्ञान विषयाच्या माध्यमातून शाळेला बक्षीस पात्र ठरवणाऱ्या व्ही.एस.पवार या शिक्षकाचा सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

